RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

१२ गुरुवार मार्च २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २८५

✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

## ओमानच्या सलालाह बंदरातील तेलसाठ्यावर ड्रोन हल्ला

■ ओमानमधील दक्षिणेकडील शहर सलालाह बंदरातील तेल साठवण टाक्यांवर ड्रोन हल्ला झाला आहे. ओमानच्या सरकारी माध्यमांनुसार, ड्रोन हल्ल्यानंतर बंदरातील इंधन साठवण टाक्यांना आग लागली, जरी कोणतीही जीवितहानी झाली नाही. या हल्ल्यामागे कोणाचा हात आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. सागरी सुरक्षा कंपनी एम्ब्रेअरने सांगितले की या घटनेत बंदरातील कोणत्याही व्यापारी जहाजाचे नुकसान झाले नाही. या घटनेनंतर, ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक अल-सईद इराणचे अध्यक्ष मसूद पझ्श्कियान यांच्याशी फोनवरून बोलले आणि ओमानच्या भूभागावरील हल्ल्यांबद्दल नाराजी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की ओमान आपली सुरक्षा आणि स्थिरता राखण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलेल.

# अध्यक्ष बिर्लांविरोधातील अविश्वास प्रस्ताव फेटाळला

## शहा म्हणाले- डोळा मारणारे अध्यक्षांवर प्रश्न उपस्थित करताहेत, विरोधकांच्या 'माफी मागा' अशा घोषणा

**▸विदर्भ केसरी।**

बुधवारी, लोकसभेत अध्यक्ष ओम बिर्ला यांना त्यांच्या पदावरून हटवण्यासाठीचा अविश्वास प्रस्ताव आवाजी मतदानाने फेटाळण्यात आला. सभागृहाच्या कामकाजादरम्यान त्यांच्यावर भेदभाव केल्याचा आरोप करण्यात आला. तत्पूर्वी, गृहमंत्री अमित शहा यांनी ५६ मिनिटांचे भाषण केले. यादरम्यान, त्यांनी राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षावर जोरदार हल्ला चढवला, १७ व्या आणि १८ व्या लोकसभेत त्यांना बोलण्यासाठी मिळालेल्या मर्यादित वेळेची आठवण करून दिली.

त्यांनी स्पष्टपणे सांगितले की सभागृह नियमांनुसार चालेल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोणालाही थांबवण्याचा आणि व्यत्यय आणण्याचा अध्यक्षांना अधिकार



आहे. हे सभागृह जत्रा नाही; जे नियमांचे पालन करत नाहीत त्यांचे मायक्रोफोन बंद केले जातील.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे नाव न घेता शाह म्हणाले, "भाऊ, आपल्याला येथे नियमांनुसार बोलावे लागते. येथे इतके ज्येष्ठ सदस्य बसले आहेत. मला अजूनही शशी थरूर आणि बालू साहेब इथे बसलेले आहेत हे समजत नाही. तुम्ही त्यांना का शिकवत नाही?" ते येतात आणि पंतप्रधान मोदींना मिठी मारतात, डोळे मिचकावतात आणि फ्लाइंग किस देतात. मला बोलतानाही लाज वाटते. जर मी कोणाकडे बोट दाखवले तर चार बोटे माझ्याकडेच उभी राहतात. यापूर्वी, रविशंकर प्रसाद यांनी राहुल गांधी आणि विरोधी पक्षांवर अनेक आरोप केले. राहुल गांधींनी असे उत्तर दिले की जेव्हा जेव्हा ते बोलणार होते तेव्हा त्यांना अडवले जात होते. ते म्हणाले की ही चर्चा लोकशाही आणि सभापतींच्या भूमिकेबद्दल होती. ते म्हणाले की त्यांचे नाव अनेक वेळा घेतले जात होते. त्यांना नेहमीच बोलण्यापासून रोखले जात होते. राहुल म्हणाले की शेवटच्या वेळी जेव्हा ते बोलले तेव्हा त्यांनी पंतप्रधानांच्या तडजोडीचा मुद्दा उपस्थित केला होता. सभागृह देशाचे प्रतिनिधित्व करते. विरोधी पक्षनेत्याला बोलू न देण्याची ही पहिलीच वेळ आहे. पंतप्रधान कॉम्प्रोमाइज्ड आहेत. राहुल गांधी इतके बोलल्यानंतर रविशंकर प्रसाद म्हणाले, "कधीही नाही...कधीही नाही. पंतप्रधान मोदींच्या भारताशी कधीही तडजोड केली जाणार नाही. त्यांच्याकडे सामान्य ज्ञानाचाही अभाव आहे." सभापतींच्या खुर्चीला अनेक वेळा घेराव घालण्यात आला आणि त्यांच्यावर कागदपत्रे फेकण्यात आली, पण ते हसत राहिले.

### शहा यांनी काँग्रेस आणि राहुल गांधी यांना सभागृहात किती वेळ मिळाला हे सांगितले

- **त्यांनी किती वेळ बोलायचे याचे नियम आहेत. १७ व्या लोकसभेत काँग्रेसला १५७ तास ५५ मिनिटे देण्यात आली होती, जरी त्यांच्याकडे ५२ सदस्य होते. भाजपकडे सहा पट जास्त सदस्य होते, तरीही काँग्रेसला भाजपपेक्षा सहा पट जास्त वेळ देण्यात आला होता.**
- **१८ व्या लोकसभेत काँग्रेसलाही भाजपपेक्षा दुप्पट वेळ मिळाला. विरोधी पक्षनेते दावा करतात की त्यांना बोलण्याची परवानगी नाही. पण जेव्हा संधी मिळते तेव्हा ते जर्मनी किंवा इंग्लंडमध्ये असतात. मग ते तक्रार करतात.**
- **१८ व्या लोकसभेत काँग्रेस सदस्य १५७ तास ५५ मिनिटे बोलले. मी विरोधी पक्षनेत्यांना विचारू इच्छितो की त्यांनी त्यावेळी का बोलले नाही. त्यांना कोणी थांबवले? त्यांच्या पक्षातील कोण बोलायचे हे ठरवण्याचा त्यांचा अधिकार आहे.**
- **विरोधी पक्षनेते सभापतींविरुद्धच्या प्रस्तावावरही बोलत नाहीत. मग ते प्रस्ताव का आणतात? प्रथम, त्यांना बोलायचे नाही. त्यांना बोलायचे आहे, पण ते नियमांनुसार बोलू इच्छित नाहीत.**
- **राहुल वक्फ दुरुस्ती आणि कलम ३७० सारख्या चर्चेला अनुपस्थित राहिले. एसआयआरवर चर्चा झाली. विरोधी पक्षनेत्याला बोलण्यास सांगण्यात आले. त्यांनी सभागृहात गोंधळ घातला. त्यांना अचानक कल्पना आली की माझ्या पत्रकार परिषदेवर चर्चा झाली पाहिजे. तुमच्या पणजोबांपासून ते तुमच्या आजीपर्यंत तुमच्या वडिलांपर्यंत, प्रमुख नेत्यांच्या पत्रकार परिषदेवर कधीही चर्चा झाली नाही.**

## कुजलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह; खुनाची शक्यता

**▸विदर्भ केसरी। नागपूर,**

नवीन कामठी पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या खैरी शिवार परिसरात बुधवारी एका अज्ञात व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी तुर्तास आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. मात्र, मृत व्यक्तीवर चाकूने वार केल्याच्या खुना आणि मृतदेहाजवळ दारुच्या बाटल्या पडलेल्या आहेत. त्यामुळे हा खूनाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर-कामठी मार्गावरील खैरी शिवारातील निर्जन भागातून काही नागरिकांना तीव्र दुर्गंधी येत होता. परिसरात शोध घेतला असता नाल्याजवळ एका व्यक्तीचा मृतदेह पडलेला दिसून आला. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने पोलिसांना माहिती देण्यात आली. नवीन कामठी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली असता मृतदेहाजवळ दारूच्या रिकाम्या बाटल्या तसेच सिगारेटची पाकिटे आढळून आली. तसेच मृत व्यक्तीच्या पोटावर खोल जखमा दिसून आल्या असून परिसरात रक्ताचे डागही आढळल्याने हा प्रकार खुनाचा असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## तिरोड्यात द बर्निंग कारचा थरार ...

**▸विदर्भ केसरी। तिरोडा,**

शहरातील बसस्थानक परिसरात गोंदिया-तुमसर राष्ट्रीय महामार्गावर बुधवारी ११ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास एमएच ३१ सीएस ६९२८ क्रमांकाच्या एका धावत्या गॅस किट आधारीत मारूती ओमणी कारने अचानक पेट घेतला. यावेळी चालकाच्या सतर्कतेने चालक व कारमध्ये बसलेल्या प्रवाशांचे प्राण वाचले. मात्र, कार पुर्णतः जळून खाक झाली.

## ९ पथक सज्ज

**▸विदर्भ केसरी। वर्धा,**

शासनाने व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद केला तर घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात जवळपास ६० रुपयांनी वाढ झाली. त्याचा फटका जिल्ह्यालाही बसत असून मंगळवारी केंद्र सरकारने एस्मा कायदा लागू गेला आहे. संबंधित कायदा लागू होताच आज बुधवार ११ रोजी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात गॅस सिलेंडरचा काळाबाजार होऊ नये म्हणून पुरवठा विभागाच्या नेतृत्वात जिल्ह्यात ९ पथक गठीत करण्यात आले आहे.

## चाकूने वार करून एकाचा खून

**▸विदर्भ केसरी। परतूर :**

मंठा तालुक्यातील गुळखंड तांडा येथे जुन्या जागेच्या वादातून दोन गटात झालेल्या भीषण हाणामारीत एका ५४ वर्षीय व्यक्तीचा चाकूने वार करून निर्घृण खून करण्यात आला, तर त्यांचा मुलगा या हल्ल्यात गंभीर जखमी झाला आहे. ही धक्कादायक घटना बुधवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास घडली असून, याप्रकरणी परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाउसाहेब रावसाहेब राठोड (वय ५४) असे मृताचे नाव असून, त्यांचे मुलगा नवनाथ राठोड हे या हल्ल्यात गंभीर जखमी झाले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी अलका नवनाथ राठोड आणि आरोपी यांच्यात गावातील एका मोकळ्या जागेवरून मागील १५ दिवसांपासून वाद सुरू होता. बुधवारी सकाळी अलका यांचे सासरे भाउसाहेब राठोड आणि आजेसासरे रावसाहेब सिताराम राठोड हे आरोपी साईनाथ राठोड याच्या दुकानासमोर उभे असताना त्यांच्यात पुन्हा वादाची ठिणगी पडली. यावेळी आरोपी रावसाहेब राठोड, साईनाथ राठोड, संतोष राठोड यांच्यासह घरातील इतर सदस्य हातात चाकू, लाठ्या आणि दगड घेऊन आले. आरोपींनी 'तुला आता प्लॉटच देतो' असे म्हणून शिवीगाळ करत भाउसाहेब यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी साईनाथ राठोड याने आपल्या हातातील चाकूने भाउसाहेब यांच्या पोटावर खोलवर वार केले.

वडिलांचा ओरडण्याचा आवाज ऐकून मुलगा नवनाथ राठोड आणि सून हे धावून आले असता, आरोपींनी नवनाथ यांच्यावरही जीवघेणा हल्ला चढवला. सोहन आणि संतोष राठोड यांनी 'यालाही जिवंत सोडू नका' असे म्हणत नवनाथ यांच्या पोटावर, पाठीवर आणि मांडीवर चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात नवनाथ हे रक्ताच्या थारोळ्यात कोसळले.

## मोबाईल रिचार्ज संपल्यानंतरही इनकमिंग सुरू असावे; राघव चड्ढा

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**

मोबाईल रिचार्ज संपल्यानंतर इनकमिंग कॉल आणि एसएमएस बंद होण्याच्या मुद्द्यावर आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढा यांनी राज्यसभेत आवाज उठवला. त्यांनी प्रीपेड मोबाईल ग्राहकांच्या अडचणी मांडत दूरसंचार कंपन्यांच्या रिचार्ज धोरणावर प्रश्न उपस्थित केले.

भारतामध्ये सुमारे १२५ कोटी मोबाईल वापरकर्ते असून त्यापैकी जवळपास ९० टक्के ग्राहक प्रीपेड रिचार्जवर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत रिचार्जची वैधता संपल्यानंतर इनकमिंग कॉल आणि एसएमएसही बंद होणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. रिचार्ज संपल्यावर आउटगोइंग कॉल बंद होणे समजण्यासारखे असले तरी इनकमिंग कॉल बंद झाल्यास नागरिकांशी संपर्क तुटतो. त्याचबरोबर बँक ओटीपीसारखे महत्त्वाचे संदेशही मिळत नाहीत, त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत नागरिक पूर्णपणे संपर्कविहीन होऊ शकतात, असे त्यांनी सांगितले.



या पार्श्वभूमीवर त्यांनी काही महत्त्वाच्या मागण्या केल्या. शेवटच्या रिचार्जनंतर किमान एक वर्ष इनकमिंग कॉल आणि एसएमएस सुरू ठेवावेत, अशी मागणी त्यांनी केली. तसेच मोबाईल क्रमांक शेवटच्या रिचार्जनंतर किमान तीन वर्षे बंद करू नये, अशीही सूचना त्यांनी केली. याशिवाय केवळ इनकमिंग कॉल, ओटीपी आणि सरकारी सेवांसाठी वापर करणाऱ्या ग्राहकांसाठी कमी किमतीचा "इनकमिंग-ओन्ली" प्लॅन सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली. दरम्यान, २८ दिवसांच्या रिचार्ज प्लॅनवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केला. एखाद्या प्लॅनला 'मासिक' म्हटले जात असताना तो ३० किंवा ३१ दिवसांचा असणे अपेक्षित आहे. मात्र २८ दिवसांच्या चक्रामुळे ग्राहकांना वर्षभरात प्रत्यक्षात १३ वेळा रिचार्ज करावा लागतो, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे दूरसंचार कंपन्यांनी रिचार्ज योजना कॅलेंडर महिन्याशी सुसंगत कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. आजच्या काळात मोबाईल फोन ही चैनीची वस्तू नसून नागरिकांसाठी अत्यावश्यक साधन बनले आहे. त्यामुळे प्रीपेड ग्राहकांना न्याय आणि पारदर्शकता मिळणे गरजेचे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

## प्रलंबित मागण्यांसाठी विमाशि संघाचे जि.प.समोर धरणे

**▸विदर्भ केसरी। वर्धा,**

: विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ जिल्हा वर्धाचे वतीने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ जिल्हा परिषद कार्यालय समोर आज ११ रोजी धरणे आंदोलन करण्यात आले.



शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी. टी. ई. टी.ची अट रद्द करावी. संच मान्यताबाबतचा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करावा. राज्य शासकीय कर्मच्याऱ्यांप्रमाणे शिक्षकांना १०-२०-३० वर्षाची आश्वासित प्रगती वेतन योजना लागू करावी. अंशतः अनुदानित शाळांना तात्काळ अनुदान मंजूर करावे. शिक्षकांची सर्व रित पदं तात्काळ भरावे. शिक्षकांना शासन निर्णयानुसार अशैक्षणिक कामातून मुत करा. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडी प्रदान करा, विद्यार्थी हितासाठी कमी पटसंख्येच्या शाळा बंद करू नये. खाजगी इंग्रजी शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन व सेवा नियम लागू करण्यात यावे आदी मागण्या करण्यात आल्या.आंदोलनाचे नेतृत्व शिक्षक आ. सुधाकर अडबाले, जयप्रकाश थोटे, विष्णू इटनकर, माजी शिक्षक आमदार व्ही. यू. डायगव्हाणे यांनी केले.

## पत्नीने केल्या मारहाणीत पतीचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी। अमरावती,**

वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खारतळेगाव येथे एका ३३ वर्षीय पत्नीने ४२ वर्ष पतीला मारहाण केली. या मारहाणीत पतीचा मृत्यू झाला. या प्रकरणी वलगाव पोलिसांनी मृतकाच्या पत्नीविरुद्ध बुधवारी (दि. ११) दुपारच्या सुमारास खुनाचा गुन्हा दाखल केला.

मंगेश देविदास गोटे (४२, रा. खारतळेगाव) असे मृतकाचे तर छाया असे त्याच्या पत्नीचे नाव आहे. मंगेश हा दारू पिण्याच्या सवयीचा होता. तो अनेकदा दारू पिऊन पत्नीला त्रास देत होता. यातूनच त्यांच्यात नेहमी खटके उडायचे. दरम्यान मंगळवारी (दि. १०) मंगेश आणि छाया यांचे कडाक्याचे भांडण झाले. यावेळी रागाच्या भरात पत्नी छायाने



पतीला मारहाण केली. त्यानंतर त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. उपचारादरम्यान मंगळवारी सायंकाळी मंगेशचा मृत्यू झाला. त्यावेळी बाह्यजखमा मंगेशच्या शरीरावर दिसत नसल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान बुधवारी सकाळी मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदनाचा प्राथमिक अहवाल पोलिसांना प्राप्त झाला. त्यावेळी अंतर्गत जखमांमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले. त्यामुळे वलगाव पोलिसांनी या प्रकरणात मंगेशच्या पत्नीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. अशी माहिती पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी दिली आहे.

## पैसे न मिळाल्याने ग्राहकांच्या संयमाचा बांध फुटला

**▸विदर्भ केसरी। चंद्रपूर,**

: येथील 'यहोवा यिरे बचत निधी लिमिटेड' या संस्थेत आपल्या काबाडकष्टाचे पैस गुंतवणाऱ्या ग्राहकांच्या संयमाचा बांध बांध फुटला आणि त्यांनी तिकडे मोर्चा वळवला. मागील तीन महिन्यांपासून हक्काचे पैसे मिळवण्यासाठी या संस्थेच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवणाऱ्या गुंतवणूकदारांनी बुधवारी आक्रमक पवित्रा घेत, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश बोरकुटे यास घेराव घातला.

यहोवा-यिरे बचत निधी लिमिटेडच्या जिल्ह्यात व जिल्हा बाहेर अनेक शाखा आहेत. या शाखेच्या माध्यमातूनग्राहकांनी मुदत



ठेव, रिकरिंग डिपॉझिट आणि बचत खात्याच्या माध्यमातून लाखो रुपये गुंतवले आहेत. मात्र, गेल्या तीन महिन्यांपासून ग्राहकांना परतावा देण्यास संस्थेकडून टाळाटाळ केली जात होती. रोख उपलब्ध नाही किंवा वरिष्ठ कार्यालयाकडून निधी आलेला नाही, अशी कारणे देऊन गुंतवणूकदारांना रिकाम्या हाती परत पाठवले जात होते. त्यामुळे गुंतवणूकदारामध्ये संतापाची लाट उसळली.

बुधवारी चंद्रपूरसह पोंभुर्णा, गडचांदूर, वरोडा, भद्रावती, घुग्घुस आदी शाखेतील गुंतवणूकदार संस्थेच्या चंद्रपूर येथील शाखेत धडकले व रोष व्यक्त केला. एप्रिल अखेरपर्यंत पैसे न मिळाल्यास अधिकृत तक्रार दाखल करण्याचा इशारा गुंतवणूकदारांनी दिला. या प्रकारामुळे खासगी वित्त संस्थांच्या विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, लहान गुंतवणूकदार मात्र हवालदिल झाला आहे.

**■ कर्जाची वसुली न झाल्याने परतफेडीस विलंब : रमेश बोरकुटे**

परिस्थिती तणावपूर्ण होत असल्याचे पाहून संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश बोरकुटे यांनी कार्यालयात दाखल होत ग्राहकांशी चर्चा केली. कर्ज वसुली योग्य प्रकारे होत नसल्याने गुंतवणूकरांचे पैसे देण्यात विलंब झाला आहे. संस्थेने दिलेली कर्ज वसुलीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या वसुलीतून जमा होणाऱ्या निधीतून 20 एप्रिल ते 30 एप्रिल दरम्यान गुंतवणूकदारांच्या रकमेची परतफेड करण्यात येईल, असे आश्वासन बोरकुटे यांनी गुंतवणूकदारांना दिले.

## दर्यापूरच्या 'रणरागिणींचा' २२ मार्चला सन्मान

### ⏭ युवा उद्योजक मंचतर्फे 'तेजस्विनी पुरस्कार' जाहीर

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर (विशेष प्रतिनिधी)**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्थानिक एकरूप बहुउद्देशीय संस्था संचलित युवा उद्योजक मंच, दर्यापूर यांच्या वतीने यावर्षीच्या मानाच्या 'तेजस्विनी पुरस्कार २०२६' ची घोषणा करण्यात आली आहे. आपल्या कर्तृत्वाने दर्यापूर तालुक्याचा नावलौकिक वाढवणाऱ्या ६ कर्तृत्ववान महिलांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली.




या गौरव सोहळ्यात क्रीडा क्षेत्रातून कु. उमा काशीरामजी बुंदेले (क्रीडा शिक्षिका), आरोग्य क्षेत्रातून डॉ. अश्विनी अभिजीत देवके (आरोग्य अधिकारी), शिक्षण क्षेत्रातून कु. संगीता हरिभाऊ कोकाटे (शिक्षिका), कला क्षेत्रातून सौ. अर्चना जितेश रापर्तीवार (नृत्य दिग्दर्शिका), उद्योग क्षेत्रातून सौ. पुनम विजय पानपालिया (महिला उद्योजिका) आणि प्रशासन क्षेत्रातून कु. मंगला काशीराम साळुंखे (ग्रामसेविका) यांचा समावेश आहे. निवड झालेल्या या महिलांच्या कार्याची सविस्तर माहिती संस्थेच्या अधिकृत इंस्टाग्राम पेजवर (@ekrup_bahuuddeshiy_ sanstha) उपलब्ध करून देण्यात आली आहे. पुरस्कार वितरण सोहळा रविवार, २२ मार्च २०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता माहेश्वरी भवन, अकोट रोड, बनोसा येथे आयोजित करण्यात आला आहे. समाजातील विविध क्षेत्रांत स्वकर्तृत्वाने ठसा उमटवणाऱ्या या महिलांच्या सन्मानासाठी दर्यापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन युवा उद्योजक मंच व एकरूप संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमाचे तालुक्यातून मोठे स्वागत होत आहे.

## बनावट नोटा बनवणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश

**▸विदर्भ केसरी। चंद्रपूर,**

भारतीय चलनाच्या 500 रुपयांच्या बनावट नोटा तयार करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. या कारवाईत बनावट नोटा व साहित्य असा एकूण 91 लाख 15 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई मंगळवारी येथील ऊर्जानगर मेजर गेटजवळील राजश्री अपार्टमेंटमधील एका फ्लॅटमध्ये केली गेली.

या प्रकरणी आरोपी शुभम दिनेश नागर (26, रा. पंचेड, जि. रतलाम, राज्य-मध्यप्रदेश) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्तीवर असताना, उर्जानगर मेजर गेटजवळीला राजश्री अपार्टमेंट फ्लॅट क्रमांक 203 मध्ये काही व्यक्ती अवैधरित्या 500 रुपयांच्या रंगीत छायांकीत नोटा तयार करीत असल्याची माहिती मिळाली. पथकाने शिताफीने सापळा रचून त्या ठिकाणी धाड टाकली असता, त्या फ्लॅटच्या दरवाजाला कुलूप लागलेले आढळून आहे. पोलिसांनी फ्लॅट मालक सुमित कालीपथ पॉल (रा. बंगाली कॅम्प, चंद्रपूर) यास बोलावून माहिती घेतली. त्याने तो फ्लॅट मागील एक महिन्यापासून मध्यप्रदेशातील काही लोकांना भाड्याने दिल्याचे सांगितले.

पोलिसांनी फ्लॅट मालक व पंचाच्या समक्ष त्या फ्लॅटचे कुलूप तोडले. फ्लॅट मालकाच्या उपस्थितीत फ्लॅटची झडती घेतली असता, बेडरूमध्ये 10 खरडयाच्या बॉक्समध्ये भारतीय चलनाच्या नोटाप्रमाणे हुबेहुब दिसणाऱ्या 500 रुपयांच्या रंगीत छायांकीत नोटा, एक कलर प्रिंटर व इतर साहित्य असा एकूण 91 लाख 15 हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला.

पोलिसांनी सर्व मुद्देमाल जप्त केला. किरायाणे राहणाऱ्या आरोपींचा पोलिसांनी शोध सुरू केला. तपासादरम्यान आरोपी शुभम नागर यास ताब्यात घेतले. आरोपीविरूध्द दुर्गापूर पोलिस ठाण्यात कलम 318 (2), 318 (3), 336 (2), 336 (3), 182 (1) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास दुर्गापूर पोलिस करीत आहे.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
गुरुवार, १२ मार्च २०२६ 

# जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

## महिला समुपदेशन केंद्र शहर पोलीस स्टेशन वाशिम आणि सौ.सुशिलाबाई जाधव विद्यालय वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम

▸विदर्भ केसरी। वाशिम :-

महिला दिवस हा एक जागतिक उत्सव आहे.महिलांच्या हक्कांच्या व त्यांच्या सामाजिक योगदानाचा सन्मान या दिवशी केला जातो. आज आपण बदलत्या काळात महिला - पुरुष समानतेकडे वाटचाल करत आहोत. जमिनीपासून ते अवकाशापर्यंत असे एकही क्षेत्र नाही जिथे महिलांनी आपले स्थान निर्माण केलेले नाही.त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात महिलांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

जागतिक महिला दिनानिमित्त सौ.सुशीलाबाई जाधव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक



प्रभावी व प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न झाला. सौ सुशिलाबाई जाधव माध्यमिक विद्यालय व महिला समुपदेशन केंद्र शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महिला हक्क, सुरक्षा व स्वावलंबनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.महिलांनी सामाजिक आव्हानांना समर्थपणे सामोरे जावे. महिला दिनाचा खरा अर्थ स्त्री शक्तीला समाजात योग्य स्थान मिळवून देणे आहे. महिलांसाठी, विद्यार्थ्यांसाठी आरोग्य, स्वच्छता,स्त्री आरोग्य आणि संरक्षण या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विविध क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन केले.मार्गदर्शक करणारे मान्यवरांमध्ये डॉ.निकिता मुंडाले एमबीबीएस (त्वचारोग तज्ञ ) यांनी त्वचारोग हार्मोन्स बद्दल, किशोरवयीन मुली मधील त्वचेच्या समस्या व त्यावरील उपचार याविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ सौ. प्रीती इडोळे एमबीबीएस (स्त्रीरोगतज्ञ) यांनी मासिक पाळीचे स्त्री रोग संबंधित आजार होईल याबद्दलचे स्पष्टपणे सांगितले. डॉ. सौ. पल्लवी कड एमबीबीएस (स्त्रीरोगतज्ञ) यांनी मातृत्व आरोग्य गर्भधारणा व काळातील पोषण व प्रस्तुती नंतरची काळजी आणि महिलांच्या सर्वांगीण आरोग्याची माहिती दिली. सौ.वैशालीताई आरु ( शिक्षिका ) अध्यक्षा - शांतिनिकेतन महिला विकास समिती वाशिम यांनी देखील उत्कृष्टपणे महिलांवर होणारे शारीरिक मानसिक त्रास व त्यावर उपाययोजना म्हणून महिला समुपदेशन केंद्र कसे कार्य करते याविषयी मार्गदर्शन केले.

महिला दिन हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला आणि कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतील आठवीच्या विद्यार्थिनींनी उत्साहाने विविध शैक्षणिक विषयावर आधारित नाटिका सादर करून त्यांनी महिला सक्षमीकरण, आरोग्य जागरूकता व सामाजिक भान याचे प्रभावी चित्रण केले. कार्यक्रमाला उपस्थित शिक्षक कर्मचारी व पालक, सहभागी महिलांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# उमरखेड आगाराचा 'सावळा गोंधळ' चव्हाट्यावर

▸विदर्भ केसरी। ढाणकी प्रतिनिधी मिलिंद चिकाटे

उमरखेड आगाराचा परिवहन कारभार सध्या पूर्णपणे कोलमडला असून, प्रवाशांना कोणतीही पूर्वसूचना न देता ग्रामीण भागातील बस फेऱ्या अचानक रद्द केल्या जात आहेत. यामुळे संतप्त झालेले माधवराव मिटकरे प्रवासी मंडळाचे अध्यक्ष हिरासिंग चव्हाण यांनी थेट प्रादेशिक व्यवस्थापक रोहन पलगे यांच्याकडे ईमेलद्वारे तक्रार दाखल केली आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्था असुरक्षित झाली असून, अधिकारी केवळ खुर्च्या उबवण्यात मग्न असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. आदिवासी व दुर्गम भागातील प्रवाशाकडे दुर्लक्ष दिनांक ३ मार्च २०२६ रोजी ग्रामीण आणि दुर्गम डोंगराळ भागातील मुक्का मी फेऱ्या अचानक रद्द झाल्या. या भागात खासगी अवैध वाहतूक पोहो चू शकत नाही, त्यामुळे केवळ एस टीवर अवलंबून असलेल्या प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. ढाणकी हे ४५ हजार लोकसंख्येचे गाव असूनही, जिल्हा मुख्यालयाला जोडणारी एकमेव 'ढाणकी-यवतमाळ' बस वारंवार रद्द केली जाते. यामुळे विद्यार्थी, कर्मचारी आणि रुग्णांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे.

'प्रवासी राजा' दिनाचा फज्जा! विभाग नियंत्रक कचवे यांच्या कार्यकाळात 'प्रवासी राजा' दिनाचा केवळ फार्स उरला आहे. प्रवाशांशी सौजन्याने वागण्याऐवजी त्यांच्या तक्रारींचा तिरस्कार केला जातो. तक्रार निवारणासाठी संपर्क साधला असता विभागीय जिल्हा वाहतूक अधिकारी दादाराव दराडे फोन उचलत नाहीत, असा आरोपही चव्हाण यांनी केला आहे. अधिकाऱ्यांच्या इच्छाशक्तीच्या अभावा मुळे आणि "हम बोले तो कायदा " या वृत्तीमुळे ग्रामीण भागातील जनता भरडली जात आहे. रस्त्यावर धावतायत 'भंगार' बसेस ग्रामीण भागात पाठवल्या जाणाऱ्या बसेसची अवस्था अत्यंत दयनीय आहे. खिडक्या तुटलेल्या आणि इंजिन कमकुवत असलेल्या या 'खिळखिळ्या' बसेस प्रवासात वारंवार ब्रेकडाऊन होतात. प्रवाशांच्या जिवाशी खेळणाऱ्या या भंगार बसेस बंद करून चांगल्या बसेस देण्याची मागणी प्रवासी मंडळाने केली आहे.

> **"यवतमाळ जिल्ह्यातील नऊ डेपो ढेपाळले असून अवैध वाहतुकीचा धुमाकूळ सुरू आहे. वरिष्ठांनी उमरखेड आगाराच्या या भोंगळ कारभाराची कसून चौकशी करावी, अन्यथा माधवराव मिटकरे प्रवासी मंडळ तीव्र आंदोलन छेडेल."**
> **— हिरासिंग चव्हाण (अध्यक्ष, माधवराव मिटकरे प्रवासी मंडळ)**

# ट्रॅक्टक्टरांची रांग



**उपबाजार समिती शेलुबाजार येथे गहू. हरभरा या पिकाची आवक वाढल्यामुळे जवळपास एक किलोमीटर अंतरापासून शेतकऱ्यांचे मालाचे ट्रॅक्टक्टरांची रांग पाहायला मिळत आहे...!**

**(विदर्भ केसरी, फोटो श्याम अपूर्वा)**

# प्रज्ञापर्व समिती 2026 अध्यक्षपदी प्रा. डॉ. सुनील खाडे यांची निवड !

▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते

धम्मनायक सम्राट अशोक महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून संभाजी नगर येथील लूंबिनी बुद्ध विहार येथे सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रज्ञापर्व समितीचे माजी अध्यक्ष आद. मिलिंदजी जाधव यांनी मागील कार्यकाळात केलेल्या कार्याचा लेखा,जोखा हिशोब पार दर्शकतेने सर्व समाज बांधवासमोर मांडला . यावेळी सर्वप्रथम महाकारुनिक तथागत



बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच सामूहिक रित्या बुद्धवंदना ग्रहण करण्यात आली. 2025प्रज्ञापर्व समितीचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी आपल्या मनोगतामध्ये सर्व समाजबंधवाकडून केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे धन्यवाद मानून पुढील कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. यावेळी सर्वानुमते आंबेडकरी चळवळीचे एक उच्च विद्या विभूशीत,शांत व, संयमी, अभ्यासू व्यक्तिमत्व आंबेडकरी चळवळीच्या विचाराची नाळ जोडणारे अशी त्यांची ओळख आहे.

[या निवडीमध्ये अध्यक्षपदाच्या निवडीसाठी पाच उमेदवारांनी आपली उमेदवारी स्वतः उभे राहून जाहीर केली यामध्ये प्रामुख्याने, प्रा. सुनील खाडे , राजेश ढोले, विजय निखाते,व रवी तायडे, प्रीतम आळणे इत्यादीनी आपली उमेदवारी जाहीर केली होती. परंतु अध्यक्षपदासाठी पाच उमेदवारांपैकी एकच उमेदवार देणे अपेक्षित असल्याने प्रज्ञापर्व उपस्थित माजी अध्यक्ष यामध्ये ज्येष्ठ सुखदेवराव भगत यांनी प्रा. सुनील खाडे यांच्या नावाची घोषणा केल्याने उर्वरित चार उमेदवार यांनी त्यांच्या उमेदवारीला पसंती दर्शवली आहे. व अखेर त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. स्वयंस्फूर्तीने बाबासाहेब आंबेडकरानी आपल्यासाठी केलेल्या कार्याची जान ठेऊन ज्या समाजामध्ये आपण जन्माला आलो त्या समाजाचं काही तरी देण आहे. ह्या ऊदात्त हेतू साठी 2026 च्या प्रज्ञापर्व समिती अध्यक्ष पदी प्रा. डॉ. सुनिल खाडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.... यावेळी माजी अध्यक्ष मिलिंदजी जाधव सर यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष प्रा. डॉ. सुनिल खाडे यांना पदभार व शुभेच्छा देऊन सन्मानित केले. या सहविचार सभेचे आभार व प्रास्ताविक मिलिंद जाधव यांनी केले. या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित भीमराव दादा कांबळे, किशोर दादा कांबळे बुद्धरत्न भालेराव, शितल कुमार वानखेडे, सुखदेवराव भगत, साहेबराव धबाले अर्जुन भगत सोनू वरठी, किशोर मुजमुले, देवेंद्र खडसे,पाडेन सर, नारायण ठोके वा समाज बांधव कार्यकर्ता पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## अग्रलेख

# संभाजी महाराज

अवघ्या 32 वर्षांच्या आयुष्यात छत्रपती संभाजी महाराज यांनी बलाढ्य औरंगजेबाविरुद्ध निर्भयपणे संघर्ष करत स्वराज्याचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानाची स्मृती 11 मार्च या स्मृतिदिनी प्रेरणा देत राहते. अवघे 32 वर्षांचे आयुष्य लाभलेल्या छत्रपती संभाजीराजांनी भारतीय इतिहासात जे शौर्य, धैर्य आणि औदार्य दाखविले त्याला तोड नाही. त्यांना प्रत्यक्ष पाहणारा फ्रेंच पर्यटक अॅबे कॅरे म्हणतो, 'संभाजीसारखा पराक्रमी, बुद्धिमान आणि सुंदर राजपुत्र मी भारत सोडून अन्यत्र पाहिला नाही.' छत्रपती शिवाजीराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे राज्य सहज जिंकता येईल, या इराद्याने औरंगजेब स्वराज्यात आला तेव्हा छत्रपती संभाजीराजे केवळ 24 वर्षांचे होते. औरंगजेबाविरुद्ध अत्यंत निकराचा लढा संभाजीराजांनी दिला. बऱ्हाणपुरापासून गोवा आणि विजापूरपासून जंजिऱ्यापर्यंत औरंगजेबाला सळो की पळो करून सोडले. औरंगजेब हा त्या काळातील जगातील सर्वात मोठा सत्ताधीश होता. औरंगजेबाने मराठ्यांचे स्वराज्य गिळंकृत करण्यासाठी जंग जंग पछाडले; परंतु संभाजीराजांनी त्याचे सर्व प्रयत्न हाणून पाडले. एक-दोन वर्षांसाठी दक्षिणेत आलेल्या औरंगजेबाला सुमारे 27 वर्षे राजधानीपासून दक्षिणेकडे थांबावे लागले. शेवटी त्याचा अंत महाराष्ट्रातच झाला. शंभूराजांनी त्याला जेरीस आणले. औरंगजेबाच्या पदरी असणारा खाफीखान म्हणतो, 'संभाजीराजे मोगलांसाठी शिवाजीराजांपेक्षा दहा पटीने तापदायक होते.' औरंगजेबासारख्या धूर्त, पाताळयंत्री, क्रूर आणि निर्दयी समाटाचा संभाजीराजांनी मोठ्या धैर्याने आणि शौर्याने प्रतिकार केला. ते स्वराज्य रक्षणासाठी मोगल, सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्राजाविरुद्ध लढत होते. संकटसमयी कोणत्याही दैवावर विश्वास न ठेवता मोठ्या धैर्याने लढतो तो खरा वीरपुरुष, असे संभाजीराजांचे मत होते. संभाजीराजेंनी सावत्र बंधू राजाराम महाराजांना अत्यंत प्रेमाने वागविले. त्यांचे तीन विवाह करून दिले. मातोश्री सोयराबाई यांना सावत्रपणाची वागणूक न देता अत्यंत आदराने वागविले. पत्नी येसुबाईंना संभाजीराजांनी सर्वाधिकार दिले. त्यांना स्वराज्याचे कुलमुखत्यार केले. 'श्री सखी राज्ञी जयतू' या नावाचा येसूबाईंचा शिक्का बनविला. राज्यातील सैनिकांना आणि रयतेला त्यांनी सन्मानाने वागविले, याबाबत अॅबे कॅरे म्हणतो, 'संभाजीराजे वयोवृद्ध आणि समवयस्क सैनिकांना अत्यंत मायेने आणि आदराने वागवतात. जखमी सैनिकांना भेटून त्यांच्या औषधोपचाराबाबत चौकशी करतात.' वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी दहा हजार सैन्यांनिशी गुजरात मोहीम यशस्वी करून शत्रूंना पराभूत केले, असे कॅरे सांगतो. त्यांनी रणांगणाप्रमाणे ज्ञानाचे क्षेत्रदेखील गाजविले. ते विद्याव्यासंगी होते. संस्कृत, हिंदी भाषांवर त्यांचे प्रभूत्व होते. त्यांनी 'बुधभूषण' हा संस्कृत, तर 'नखशिख', 'नायिकाभेद', 'सातसतक' हे हिंदी ग्रांथ लिहिले. तत्कालीन धर्मपंडित गागाभट्ट यांनी 'समयनय' हा ग्रांथ संभाजीराजांना अर्पण केला आहे. प्राच्यविद्यापंडित शरद पाटील संभाजीराजांना 'महापंडित' म्हणून गौरवितात. संभाजीराजांना शिवरायांनी वाराणसीत शाक पंडित कवी कुलेश यांच्याकडे ठेवले. ते दिलेरखानाकडे गेले. म्हणून त्यांचा प्राण वाचला, अन्यथा मंत्र्यांनी त्यांचा घात केला असता, असे शरद पाटील सांगतात. अत्यंत प्रतिकूल काळात संभाजीराजांनी स्वराज्याचे रक्षण केले. त्यामुळे ते स्वराज्यरक्षक ठरतात. स्वराज्य संवर्धनासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यामुळे ते स्वराज्यसंवर्धक ठरतात. औरंगजेबाच्या सरदारांनी संभाजीराजांना दि. 1 फेबुवारी 1689 रोजी कोकणातील संगमेश्वर या ठिकाणी पकडले. नगर जिल्ह्यातील भीमेच्या काठावर असणाऱ्या बहादूरगड येथे आणले. त्यांना अपमानित केले. प्रचंड झळ केला; परंतु संभाजीराजे डगमगले नाहीत. शरण गेले नाहीत. प्राण वाचविण्यासाठी औरंगजेबाकडे तडजोड केली नाही. संभाजीराजांचे सुमारे 39 दिवस हाल-हाल केले. त्यांचे डोळे, जीभ कापून त्यांच्या शरीराचे तुकडे-तुकडे केले. मृत्यूला न घाबरता अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा संभाजीराजांच्या बलिदानाने मराठ्यांना मिळाली. (अठरापगड जातींना मराठा म्हटले आहे.) त्यांच्या बलिदानाला जगाच्या इतिहासात तोड नाही. 11 मार्च संभाजीराजांचा स्मृतिदिन. त्यानिमित्त त्यांना विनम अभिवादन!




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

GOOD MORNING
# कॉटनसिटी



!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## महिलेला मारहाण करणाऱ्या दोघांवर कारवाई

यवतमाळ : दुकानात जाऊन एका महिलेला मारहाण केल्या प्रकरणी घाटंजी पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. धनराज खुशाल दर्शनवार आणि अशोक गंगाराम दर्शनवार दोन्ही रा. नृसिंह वार्ड घाटंजी अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. नृसिंह वार्डातील महिला ललिता नर्सिंग दर्शन (५५) या दुकानात असताना आरोपींनी संगनमत करून त्यांच्याशी वाद घातला. बांबूच्या काठीने त्यांच्या हातावर मारहाण करून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी ललिता दर्शन यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला.

# शेतकरी आत्महत्यांचा मुद्दा संसदेत

### प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची खासदार संजय देशमुख यांची मागणी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ–वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांनी आज लोकसभेत यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नाकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले. खासदार देशमुख यांनी प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजना संदर्भात प्रश्न उपस्थित करत जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांचा मुद्दा ठळकपणे मांडला.

सदरील प्रश्नात त्यांनी नमूद केले की यवतमाळ जिल्ह्याची निवड पीएम-डीडीकेवाई योजनेअंतर्गत करण्यात आली असली, तरीही जिल्ह्यातील शेतकरी अद्याप गंभीर अडचणींचा सामना करत आहेत. त्यांनी विशेषतः अधोरेखित केले की जानेवारी 2026 या एकाच महिन्यात जिल्ह्यात 25 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. त्यामुळे या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, कर्जाचा ताण कमी करणे, सिंचन सुविधा वाढवणे तसेच कापूस व इतर पिकांना स्थिर व योग्य बाजारभाव मिळवून देण्यासाठी सरकारने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

यावरती कृषी व किसान कल्याण राज्यमंत्री श्री.भगीरथ चौधरी जी यांनी उत्तरात सांगितले की यवतमाळ जिल्ह्याची निवड प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना अंतर्गत करण्यात आली आहे. ही योजना 2025-26 पासून पुढील सहा वर्षांसाठी देशातील 100 जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश कृषी उत्पादकता वाढवणे, पीक विविधीकरणाला चालना देणे, शाश्वत शेती पद्धती प्रोत्साहित करणे, पंचायत व तालुका स्तरावर काढणीनंतरच्या साठवणूक सुविधा वाढवणे तसेच सिंचन सुविधांमध्ये सुधारणा करणे हा आहे.

श्री.भगीरथ चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, यवतमाळ जिल्ह्यासाठी तयार करण्यात आलेल्या जिल्हा कृती आराखड्यात (District Action Plan) उन्नत बियाण्यांचा वापर, सुधारित पेरणी पद्धती, बागायती क्षेत्र वाढवणे, साठवणूक गोदामे उभारणे आणि सूक्ष्म सिंचनाचा विस्तार यांसारख्या उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच या योजनेअंतर्गत ब्रॉड बेड फरो (BBF) तंत्रज्ञानाचा विस्तार, मृदा आरोग्य कार्डावर भर, हळद व फळबाग लागवडीचा विस्तार, तसेच सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र वाढवण्याची योजना आखण्यात आली आहे. याशिवाय जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड (KCC) अंतर्गत कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचे ही नियोजन करण्यात आले असल्याचे स्पष्ट केले. खासदार देशमुख यांनी सांगितले की यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी दीर्घकाळापासून संकटाचा सामना करत



आहेत. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारने या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे अत्यंत गरजेचे आहे,

## महत्त्वाचे

### सात वर्षांच्या आदिना मरियमचा जीवनातील पहिला रोजा

**▸विदर्भ केसरी। पुसद : प्रतिनिधी**



पुसद शहरातील वसंत नगर परिसरातील रहिवासी निसार अहमद यांची नात व जवाद अहमद यांची कन्या आदिना मरियम हिने अवघ्या सातव्या वर्षी रमजान महिन्याचा २० वा रोजा व आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण करून प्रेरणादायी उदाहरण दिले आहे. कडाक्याच्या उष्णतेत सुमारे १३ तासांचा रोजा पूर्ण करत आदिना मरियम हिने आपली दृढ इच्छाशक्ती, संयम आणि श्रद्धा यांचा उत्तम परिचय दिला. भीषण उकाड्यात या चिमुकलीने उत्साहाने आणि समर्पण भावाने रोजा पूर्ण केल्याने परिसरात तिचे कौतुक केले जात आहे. बरकत आणि इबादतीचा पवित्र रमजान महिना सुरू असताना अल्लाहची रहमत मिळवण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्नशील आहे. या पवित्र महिन्यात लहान मुलेही उत्साहाने आणि श्रद्धेने इबादतीत सहभागी होत असल्याचे दिसून येत आहे. दुसरी इयत्तेत शिक्षण घेत असलेल्या आदिना मरियम हिने एवढ्या लहान वयात पहिला रोजा पूर्ण करून कुटुंबाचे नाव उज्ज्वल केले आहे. तिचे आजोबा निसार अहमद, काका नावेद अहमद तसेच कुटुंबीय व समाजातील विविध स्तरांतील नागरिकांकडून आदिना मरियमचे अभिनंदन व शुभेच्छा दिल्या जात आहेत. तिच्या या कृतीमुळे इतर मुलांनाही प्रेरणा मिळत आहे.

### महाराष्ट्र योग शिक्षक संघाकडून जागतिक महिला दिन साजरा

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



पुसदः-महाराष्ट्र योग शिक्षकसंघ लक्ष्मीनगर पुसद येथे 8मार्च रोजी जागतिक महिलादिन राज्यउपाध्यक्ष मा.मनोज नाईकसर यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला.सर्वप्रथम राजमाता माँ जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,त्यागमुर्ती माता रमाबाई यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून त्यांचा कार्यांचा गुणगौरव करण्यात आला.या प्रसंगी नियमित योगा करणार्यां योगिनिंचा गुलाबपुष्प, व भेटवस्तूदेवून सन्मान करण्यात आला.या प्रसंगी मंदाताई अघम यांनी सुमधूर आवाजात स्वागत गित गायन केले.तर मनोज नाईक यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून ज्या देशातील महिला जेवढ्या जास्त शिकलेल्या असतील तेवढी त्या देशाची प्रगती झाली असे समजावे.त्या करिता मुलींनी उच्च शिक्षित होवून आत्मनिर्भर व्हावे.असे मत व्यक्त केले.तर अविनाश महाजन यांनी एक माता आपल्या बाळासाठी जन्मापासून उच्चशिक्षित होईपर्यंत किती कष्ट घेतात या बदल मार्गदर्शन केले. तर उध्दव भगत यांनी दरवर्षीच मोठ्या उत्साहात महिलादिन साजरा केल्यास काही अंशी माता भगिनींच्या ऋणातून षुरूषांना मुक्त होता येईल.असे मत व्यक्त केले.हा कार्यक्रम यशस्वितेसाठी यवतमाळ जिल्हा महिला प्रकोष्ट प्रभारी सौ.कल्पनाताई अँड.बाबुराव मस्के,छायाताई भगत,विद्याताई गायकवाड, अल्काराणी गायकवाड, रुपाली सातळे,निर्मला सातपूते,सुलोचना हातमोडे,रंजनाताई इंगळे,छायाताई दाढे,छायाताई बळी, ज्योतीताई कापूरे,मनोरमा मनवर,ज्योतीताई मस्के,मंगल तिलवंत, समवेत विश्वंभर गादेकर, शिवदास महाजन, भारत दहिफळे,अनंता पाटील, संजय मनवर यांनी मोलाचे सहकार्य केले. अल्पोहाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### नागपूर-हैदराबाद महामार्गावर जनावर तस्करी रोखली

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

तेलंगणाकडे कत्तलीसाठी नेल्या जाणाऱ्या जनावरांची तस्करी पांढरकवडा पोलिसांनी रोखली. ही कारवाई नागपूर-हैदराबाद महामार्गावर ११ मार्चच्या पहाटे करण्यात आली. यात १४ जिवंत बैलांची सुटका करण्यात आली. तर तीन मृत बैल आढळून आले.
यावेळी मोहम्मद रिजवान मो. रफिक शेख (३२) रा. प्लाट नं. ९५ पिली नदी टिपू सुलतान चौक, शिवशक्तीनगर नागपूर, अब्दुल रफिक अब्दुल कदिर कुरेशी (३०) रा. टेका नाका नई बस्ती नागपूर, मोहम्मद जुनेद अब्दुल कादीर (३२) रा. मोमिनपुर नगिना मश्जिदजवळ वणी, सद्दू उर्फ सद्दाम कुरेशी (३४) रा. टेका नाका नागपूर, निखील डोरले रा. भंडारा यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. नागपूरकडून एक आयचर (४० सीएम ३२३०) वाहनामध्ये जनावरे कत्तलीकरिता नेत असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली होती. त्यावरून कोंघारा फाट्याजवळ सापळा रचून हे वाहन पकडण्यात आले. सदर वाहनामध्ये १७ बैलांना त्रासदायक पद्धतीने नेले जात असल्याचे आढळून आले.

## आयुर्वेद महाविद्यालयात महिला दिन साजरा

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**




जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ आणि डॉ. मा. म. आयुर्वेद महाविद्यालय, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने 9 मार्च रोजी आयुर्वेद महाविद्यालयाच्या सभागृहात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. तसेच महिला हक्कांविषयी कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये महिला हक्कांविषयी मार्गदर्शनही करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश दिपक एच. दाभाडे होते. प्रमुख वक्त्या म्हणून पॅनल वकील निलिमा जोशी उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाला डॉ. मा. म. आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजीव मुंदाने यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. राजीव मुंदाने यांनी प्रास्ताविक करत शिबिराचे उद्दिष्ट स्पष्ट केले. प्रमुख वक्त्या श्रीमती जोशी यांनी महिलांचे हक्क, कायदेशीर संरक्षण आणि समाजातील त्यांचे स्थान याविषयी मार्गदर्शन करुन 8 मार्च हा दिवस केवळ एक दिवस साजरा न करता प्रत्येक दिवस महिला दिन म्हणून साजरा झाला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा 2005, हुंडा प्रतिबंधक कायदा तसेच बालविवाह प्रतिबंधक कायदा याबाबत सविस्तर माहिती दिली. कौटुंबिक हिंसाचार कायदा हा दिवाणी स्वरूपाचा असून त्यामध्ये थेट अटक होत नाही; मात्र न्यायालयाच्या आदेशाचे पालन न केल्यास अटक होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळाबाबतही त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. हुंड्यासाठी विवाहित महिलांवर होणारा छळ अत्यंत निंदनीय असल्याचे सांगत त्यांनी मुलींनी हुंडा मागणाऱ्या वराकडील मंडळींना नकार देण्याचे आवाहन केले. महिलांवर होणाऱ्या अत्याचारामागे अशिक्षितपणा हेही एक महत्त्वाचे कारण असल्याचे त्यांनी नमूद केले. हुंडा देणे-घेणे हे कायद्याने गुन्हा असून याबाबतच्या कायद्याच्या कलम 3 व 4 बाबतही त्यांनी माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात दिवाणी न्यायाधीश दिपक एच. दाभाडे यांनी उपस्थित महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देत महिलांनी समाजात सन्मानाने जगावे व अन्याय-अत्याचाराला बळी पडू नये, असे त्यांनी सांगितले. यासह हुंडा प्रतिबंधक कायदा व कौटुंबिक हिंसाचार विषयी मार्गदर्शन केल. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये कायद्याबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या संस्कृत प्राध्यापिका डॉ. दर्शना वरगंटिवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहयोगी प्राध्यापिका डॉ. प्रज्ञा घोरमोडे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर धनदांडग्यांचे अतिक्रमण ?

**▸विदर्भ केसरी। येवदा (रामेश्वर माकोडे) :**



महाराष्ट्र राज्य महामार्ग क्र. १९४ (अकोट–दर्यापूर मार्ग) लगत असलेल्या येवदा बसस्थानक परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर काही धनदांडग्या व्यक्तींनी बेकायदेशीररीत्या तारेचे पक्के कंपाउंड करून ताबा घेतल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाचे काही अधिकारी व पोलीस प्रशासनाला हाताशी धरूनच हे अतिक्रमण करण्यात आल्याचा आरोप होत असल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे.

माहितीनुसार, येवदा बसस्थानक परिसरात पोटाची खडगी भरण्यासाठी बसलेल्या गोरगरिबांना सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही पद्धतीने हटविण्यात आले. त्यानंतर त्याच जागेवर काही प्रभावशाली व्यक्तींनी तारेचे मजबूत कंपाउंड उभारून जागेवर बेकायदेशीर ताबा घेतल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. याच परिसरात प्रवाशांच्या सोयीसाठी बांधलेले प्रवासी निवाऱ्याच्या मागील बाजूस असलेले स्वच्छतागृहही ताब्यात घेतल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी बसस्थानकावर येणाऱ्या प्रवाशांना, विशेषतः महिला व विद्यार्थिनींना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. स्वच्छतागृहाची सुविधा बंद झाल्यामुळे महिलांना उघड्यावर जाण्याची वेळ येत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, या प्रकरणी स्थानिक नागरिक व भारतीय जनता पार्टी पदाधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार दाखल करून सदर बेकायदेशीर अतिक्रमण तात्काळ हटवून सार्वजनिक जागा मुक्त करण्याची मागणी केली आहे. तसेच कारवाई न झाल्यास येवदा बसस्थानक परिसरात आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या गंभीर आरोपांबाबत संबंधित विभागाकडून काय कारवाई होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## सभापतीपदी प्रदीप वडोदे तर उपसभापतीपदी उमेश टावरी

**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर।**





संग्रामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी प्रदीप भगवान वडोदे (रा. सोनाळा) तर उपसभापतीपदी उमेश अशोककुमार टावरी (रा.संग्रामपूर) यांची अविरोध निवड करण्यात आली. मंगळवार, १० मार्च रोजी बाजार समितीच्या सभागृहात झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली. माजी सभापती भाऊराव पाटील अवचार व उपसभापती संजीव इंगळे यांनी नियोजनाप्रमाणे आपल्या पदांचा राजीनामा दिल्याने दोन्ही पदे रिक्त झाली होती. त्या अनुषंगाने नव्या सभापती व उपसभापतींची निवड करण्यासाठी ही बैठक घेण्यात आली. या निवड प्रक्रियेसाठी खामगाव येथील सहकार विभागाचे अधिकारी आमले यांनी अध्यक्षस्थान भूषवून निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहिले. बाजार समितीचे सचिव पंकज मारोडे यांनी सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. १८ सदस्यीय संचालक मंडळ असलेल्या या बाजार समितीवर आमदार डॉ.संजय कुटे यांची एकहाती सत्ता आहे. २०२३ मध्ये झालेल्या निवडणुकीनंतर शांताराम दाणे व भाऊराव अवचार यांनी अनुक्रमे सभापतीपदाची जबाबदारी सांभाळली, तर सुरेश तायडे व संजीव इंगळे यांनी उपसभापती म्हणून कार्य केले. दरम्यान, मंगळवारी सभापतीपदासाठी प्रदीप वडोदे व उपसभापतीपदासाठी उमेश टावरी यांनी उमेदवारी अर्ज सादर केले. त्यांच्या विरोधात अन्य कोणताही अर्ज दाखल न झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दोघांचीही अविरोध निवड जाहीर केली. निवड जाहीर होताच उपस्थित संचालकांनी पुष्पगुच्छ देऊन दोन्ही पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

## एकल महिला रोजगार प्रेरणा मेळाव्याला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद!

### शासना च्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन!

**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**



बा ळापूर साऊ ए कल महिला समिती महाराष्ट्र चे निमंत्रक श्री हेरंब कुलकर्णी यांच्या मार्ग दर्शनात सेवा धर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था अकोला अंतर्गत साऊ एकल महिला समिती अकोला तथा मराठा सेवा संघ अकोला प्रणित मराठा न्यायदान कक्ष अकोला यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने एकल महिला रोजगार प्रेरणा मेळावा जिजाऊ सभागृह, मराठा सेवा संघ कार्यालय, मूर्तिजापूर रोड अकोला येथे संपन्न झाला आहे. या मेळाव्यात उद्घघटनापर महिलाना मार्गदर्शन करताना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी शासनाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत , त्या योजना ची सविस्तर माहिती देऊन लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. यावेळी जिल्हा परिषद च्या राजश्री कोलखेडे यांनी उपस्थित महिलांशी हितगुज करून , महिलाना बोलते करून त्यांच्या सोबत संवाद साधला. जिल्हा परिषदेच्या विविध योजना आणि शिक्षणाचे महत्त्व विषद केले. स्व रक्षणा करीता सजग असणे गरजेचे आहे त्याच प्रमाणे अंगणवाडी सेविका ह्या घर आणि शासन मधील दुवा असल्या चे सांगून त्यांचा कामाची प्रशंसा केली आहे. या एकल महिला रोजगार प्रेरणा मेळावा मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ च्या अधिकारी नेहल शेख, सेंट्रल ग्रामीण स्वयं रोजगार प्रशिक्षण संस्था चे संचालक विद्याशंकर तथा रश्मी घाटोळ, कॉ. सुरेखाताई ठोसर अध्यक्ष - आयटक, अकोला, मिटकॉन प्रकल्प अधिकारी प्रभाकर चौधरी, उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अकोला चे जिल्हा अभियान व्यवस्थापक नरेंद्र काकड यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या कार्यक्रम आयोजन करिता सुरेखा ताई ठोसर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.मराठा सेवा संघा च्या उपाध्यक्ष डॉ सीमाताई तायडे यांनी महिलांच्या आरोग्य विषयी समस्या व त्यांचे निराकरण केले. या त्यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन द्वारे आरोग्य विषयी माहिती दिली. मराठा न्यायदान कक्ष जिल्हा अध्यक्ष ॲड अनिल लव्हाळी न्यायदान कक्ष मार्फत सुरू करण्यात असलेल्या सल्ला केंद्रा बाबत माहिती दिली. ॲड सविता खोटरे यांनी कायदे विषयक मार्गदर्शन केले. मराठा सेवा संघ तथा जिजाऊ ब्रिगेड च्या सदस्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली आहे
या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवा धर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था अकोला चे सचिव आणि साऊ एकल महिला समिती अकोला चे जिल्हा समन्वयक तुषार हांडे यांनी केले. संचालन अनिता काळबांडे तर आभार प्रदर्शन सुनील वनारे यांनी केले आहे. ममता जरपोतवार, तसनीम बोरींगवाला यांनी परिश्रम घेतले आहेत.

## यवतमाळच्या शिरपेचात मानाचा तुरा

### आयडीए यवतमाळच्या पहिल्या दंतवैद्यकीय संशोधन नियतकालिकाचे (JYIDA) दिमाखात प्रकाशन

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**




इंडियन डेंटल असोसिएशन (I D A) यवतमाळ शाखेने दंतवैद्यकीय क्षेत्रातील ज्ञानाची व्याप्ती वा ढ वण्यासाठी एक ऐतिहासिक पा ऊ ल उ चलले आहे. शाखेच्या वतीने 'जर्नल ऑफ यवतमाळ इंडियन डेंटल असोसिएशन' (JYIDA) या पहिल्या संशोधनपर नियतकालिकाच्या (Volume 1, 2026) उद्घाटनपर अं का चे प्रकाशन नुकतेच ८ मार्च आंतर राष्ट्रीय दंतवैद्य दिवस ला कर ण्यात आले. या प्रकाशनामुळे यवतमाळच्या दंतवैद्यकीय जगतातून आनंद व्यक्त होत आहे.
संशोधनाला नवी दिशा: दंतवैद्यकीय क्षेत्रातील नवनवीन शोध, क्लिष्ट शस्त्रक्रिया आणि आधुनिक उपचार पद्धतींना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या जर्नलची ( शोध निबंध संग्रह)निर्मिती करण्यात आली आहे. 'JYIDA' हे केवळ एक पुस्तक नसून ते वैज्ञानिक जिज्ञासा आणि वैद्यकीय उत्कृष्टतेचे प्रतीक आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.प्रकाशित करताना डॉ अनिल उमरे, डॉ वेदांत लाखे, डॉ अश्विन बारस्कर, डॉ आखरे मुख्य अतिथी उपस्थिती होती.
अग्रणी नेतृत्वाचा पुढाकार: हे प्रतिष्ठित शैक्षणिक कार्य अध्यक्ष डॉ. प्रशांत बी. तामगाडगे यांच्या दूरदृष्टीतून आणि सचिव डॉ. आकाश कुडमथे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. या उपक्रमाला कोषाध्यक्ष डॉ. वैभव आगरकर डॉ. चेतन दरणे ,डॉ. रेखा कसारे पाटील, डॉ. फातेमा बॉम्बेवाला, डॉ. श्याम गाढवे, डॉ. रश्मी तामगाडगे यांचे विशेष सहकार्य लाभले. या जर्नलचे संपादक म्हणून डॉ. प्रशांत तामगाडगे यांनी धुरा सांभाळली असून,कार्यक्रमाचे संचलन डॉ चेतन दरणे यानी केले. तांत्रिक बाजू डॉ. पूजा पाली यांनी समर्थपणे हाताळली आहे.
जर्नलची काही वैशिष्ट्ये: या पहिल्या अंकात १० महत्त्वाच्या शोधनिबंधांचा समावेश आहे. यात मुख कर्करोग पुनर्रचना, डेंटल इंप्लांट्स, कोव्हिड लसीकरणाबाबत सर्वेक्षण आणि लहान मुलांमधील दंत समस्या अशा विविध विषयांवर सखोल प्रकाश टाकण्यात आला आहे. डॉ. रिझवान शेख, डॉ. अनुप गोरे डॉ. वैभव राऊत, डॉ. वैभव ठाकरे आणि इतर तज्ज्ञ डॉक्टरांच्या संशोधनाचा यात समावेश आहे.

या ऐतिहासिक क्षणी आयडीए यवतमाळचे उपाध्यक्ष डॉ. हाजी अमीन, डॉ. शोएब अकबानी, डॉ. शैलेश म्हस्के ,डॉ. अजय गिरी यांनी आनंद व्यक्त केला. डॉ. सुरेंद्र पदमावार, डॉ. अतुल इंदूरकर, डॉ.प्रसाद धाडसे यांसारख्या ज्येष्ठ मार्गदर्शकांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले आहे. हे जर्नल भविष्यात तरुण दंतवैद्यकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास आयडीए यवतमाळ शाखेतर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

## रेल्वे प्रकल्पाच्या मोबदल्यातील ४० कोटी रस्ते दुरुस्तीसाठी वापरा

### शिवसेनेच्या नगरसेवकांची मागणी

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी यवतमाळ**

अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा तसेच अंडरग्राउंड ड्रेनेजची कामे सुरू असल्यामुळे यवतमाळ शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. शहरात जागोजागी खड्डे खोदण्यात आल्याने धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. या पार्श्वभूमीवर वर्धा–यवतमाळ–नांदेड रेल्वे प्रकल्पात नगरपरिषदेची जमीन गेल्याच्या मोबदल्यात मिळालेल्या ४० कोटी ३१ लाख रुपयांचा निधी शहरातील रस्ते दुरुस्तीसाठी वापरावा, अशी मागणी शिवसेनेच्या नगरसेवकांनी नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांना दिलेल्या



निवेदनाद्वारे केली आहे.

यवतमाळ नगर परिषद क्षेत्रात अमृत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरातील अनेक रस्ते उकरून ठेवण्यात आल्याने रस्त्यांची दुर्दशा झाली असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. धुळीमुळे तसेच रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अनेक ठिकाणी अपघात घडत आहेत. काही नागरिक रस्त्यावर घसरून जखमी झाल्याच्या घटना देखील समोर आल्या आहेत. पाऊस आल्यानंतर हीच माती चिखलाचे गटार बनत असल्याने नागरिकांचे हाल होते. शहरातील मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून नवीन रस्ते बांधण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात असल्यामुळे या निधीचा उपयोग शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी करावा, अशी मागणी नगरसेवक पिंटू बांगर, बालकल्याण सभापती शोभा साबळे, चैताली बेलोकार, गजानन इंगोले, लोकेश इंगोले, सपना उपगनलावार, पूजा गायकी, आकाश परतेकी यांनी नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच शहरातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने या निधीतून तातडीने रस्ते दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी अपेक्षा शहरवासीयांकडून व्यक्त होत आहे.

## दिवसाबरोबर रात्रीचे तापमानही वाढले

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

उन्हाचा तडाखा मार्च महिन्यातच जाणवू लागला आहे. तापमान ३९ अंशापर्यंत पोहोचले आहे. मंगळवारी ३८.५ अंश दिवसाच्या तापमानाची नोंद झाली आहे. यासोबतच रात्रीच्या तापमानात मोठी वाढ झाली आहे. ३.४ अंशाने रात्रीचे तापमान वाढून १९.२ अंश इतकी नोंद झाली आहे. यामुळे आता दिवसासोबतच हळूहळू रात्रीचे तापमानही वाढू लागले आहे. पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहणार असल्याचेही हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे.

**महत्त्वाचे**




## आधारस्तंभ फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा पल्लवी इंगोले यांचा गौरव

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ प्रतिनिधी**

यवतमाळ : भारत सरकारच्या Ministry of Social Justice and Empowerment अंतर्गत कार्यरत असलेल्या Babu Jagjivan Ram National Foundation यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात आला. समाजातील वंचित, गरजू घटक तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या आधारस्तंभ फाउंडेशनच्या कार्याची दखल घेत संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा पल्लवी राजाभाऊ इंगोले यांचा सन्मानचिन्ह (मोमेंटो) देऊन गौरव करण्यात आला. आधारस्तंभ फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण, सामाजिक जनजागृती, गरजू घटकांना मदत तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना राष्ट्रीय स्तरावर हा सन्मान प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे आधारस्तंभ फाउंडेशनच्या कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून भविष्यातही समाजहितासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला

## महिलेची पोत उडविली

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

रस्त्याने जात असलेल्या एका महिलेला पत्ता विचारण्याचा बहाणा करून दोन दुचाकीस्वारांनी तिच्या गळ्यातील सोन्याची पोत उडविली. ही गंभीर घटना येथील आर्णी रोडवरील श्रमिक सोसायटी परिसरात १० मार्च रोजी दिवसाढवळ्या घडली. येथील श्रमिक सोसायटीत राहणाऱ्या लता प्रमोद बंग (६१) या जेवणाचा डबा देऊन आपल्या घराकडे परत जात होत्या. त्यावेळी दोन अनोळखी दुचाकीस्वार तोंडाला रूमाल बांधून आले. त्यांच्या दुचाकीला नंबरप्लेटही नव्हती. ते दुचाकीस्वार लता बंग यांच्याजवळ येऊन थांबले. त्यांनी 'गौरकारचे घर कुठे आहे' असा प्रश्न बंग यांना केला. त्यावर बंग यांनी 'आमच्या सोसायटीत गौरकारचे घर नाही' असे उत्तर दिले. मात्र याच बोलण्यात गुंतवून ठेवत त्या दुचाकीस्वारांनी लता बंग यांच्या गळ्यातील पोत हिसकावली. दुचाकीवर मागे बसलेल्या इसमाने ही पोत हिसकावली. त्यानंतर क्षणार्धात दोघाही दुचाकीस्वारांनी पोबारा केला. बंग यांच्या गळ्यातील ही पोत १५.६० ग्रॅम सोन्याची होती. बाजारभावानुसार तिची किंमत ९५ हजार ५०० रूपये आहे. या प्रकरणी लता प्रमोद बंग यांनी लगेच अवधूतवाडी पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी तुर्त दोन अनोळखी इसमाविरूद्ध गुन्हा दाखल केला असून त्यांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

# सिंचन विभागावर जप्ती

## जिल्हा परिषदेत उडाली खळबळ :



**▸विदर्भ केसरी। यवतमाळ,**

शेतजमिनीचा 55 लाख रुपयांचा मोबदला न दिल्याने यवतमाळ जिल्हा परिषदेतील सिंचन विभागावर बुधवार, 11 मार्चला जप्तीच्या कारवाईची नामुष्की ओढवली. यावेळी तब्बल 59 खुर्च्या, संगणक, प्रिंटर, लॅपटॉप आदी साहित्य जप्त करण्यात आले. ही जप्ती होऊ नाही यासाठी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, जप्ती करू किंवा मोबदला द्या, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली होती.

दारव्हा तालुक्यातील तेलगव्हाण येथील सुधीर राठोड, राजू राठोड यांच्या मालकीची जवळपास 4.04 हेक्टर शेतजमीन जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागाने 15 वर्षांपूर्वी पाझर तलाव उभारणीसाठी भूसंपादन प्रक्रियेद्वारे घेतली होती. त्यावेळी संबंधित शेतकऱ्यांना 5 लाख 76 हजार रुपयांचा मोबदला देण्यात आला होता.

हा मोबदला अपुरा असल्याचे सांगत राठोड कुटुंबियांनी वाढीव मोबदल्यासाठी दारव्हा दिवाणी न्यायालयात अपील दाखल केले होते. या प्रकरणात न्यायालयाने राठोड कुटुंबाच्या बाजूने निर्णय देत त्यांना व्याजासह एकूण 55 लाख 30 हजार रुपयांचा वाढीव मोबदला द्यावा, असे आदेश सिंचन विभागाला दिले होते. न्यायालयाने आदेश दिल्यानंतरही सिंचन विभागाने दीर्घकाळ मोबदला दिला नाही. शेवटी शेतकरी सुधीर राठोड यांनी पुन्हा न्यायालयाकडे धाव घेतली. दरम्यान, दारव्हा दिवाणी न्यायालयाने जिल्हाधिकारी तथा सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता आनंद पांडे यांच्या कार्यालयातील जंगम मालमत्ता जप्तीची कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार बुधवारी दुपारी 2 च्या सुमारास वॉरंट बेलिफमार्फत सिंचन विभागात न्यायालयातील अधिकारी, शेतकरी तसेच वकिलांच्या पथकाने धडक दिली. यावेळी कार्यालयातील 59 खुर्च्या, संगणक, प्रिंटर, लॅपटॉप तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून कार्यकारी अभियंत्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. परंतु प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे धनादेश देता येणार नाही, असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले. एकंदरीत जप्तीच्या कारवाई ओढवण्याची नामुष्की सिंचन विभागावर आली. यावेळी शेतकरी सुधीर राठोड, राजू राठोड, बेलिफ रवींद्र बायस्कर, ॲड. किशोर पारोदे आणि कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

**उच्च न्यायालयात अपील दाखल**

**■ दारव्हा दिवाणी न्यायालयाने संबंधित जमिनीच्या प्रकरणात मूळ मोबदल्याच्या चार पटपेक्षा अधिक रक्कम देण्याचा आदेश दिला आहे. अशा प्रकरणांमध्ये मोबदला चारपट किंवा त्यापेक्षा जास्त ठरल्यास वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करण्याची तरतूद आहे. या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात अपिल दाखल करण्यात आल्याची माहिती जिप सिंचन विभाग अधिकाऱ्यांनी दिली.**

## भुलाई-भांडेगाव टोलनाका तत्काळ बंद करा




**▸विदर्भ केसरी। दारव्हा,**

कारंजा मार्गावरील भुलाई ते भांडेगाव दरम्यान सुरू करण्यात आलेला टोलनाका तत्काळ बंद करण्यात यावा. त्यामुळे स्थानिक नागरिकांना विनाकारण आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा आरोप महाविकास आघाडीने केला आहे

दारव्हा कारंजा मार्गाची सध्याची दुर्दशा पाहता येथे टोल वसुली करणे योग्य नसल्याचे कॉंग्रेसचे मत आहे. या टोलनाक्यामुळे कारंजा व दारव्हा बाजारपेठेत दैनंदिन ये-जा करणारे शेतकरी, व्यापारी, शेतमाल वाहतूकदार, तसेच शिक्षणासाठी प्रवास करणारे विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांना विनाकारण अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे हा टोलनाका कायमस्वरूपी बंद करावा, अशी मागणी आहे. यावेळी महाविकास आघाडीच्या वतीने टोलनाक्याची तोडफोड करण्यात आली. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले असून पुढील कारवाई सुरू आहे. या आंदोलनात माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे, दारव्हा तालुका कॉंग्रेस अध्यक्ष प्रकाश नवरंगे, उबाठा शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय गाडगे, तालुका प्रमुख संतोष ठाकरे, दारव्हा नगर परिषद गटनेता सय्यद फारूख, माजी शिक्षण सभापती ज्ञानेश्वर बोरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य पंढरीनाथ सिंह, उबाठा शिवसेना शहरप्रमुख अमोल दुधे, पंढरीनाथ सिंहे, अतुल राऊत, सरफराज खान, गजानन बिबेकर, अजीम शहा, ज्ञानेश्वर खोडे यांचा प्रमुख सहभाग होता.

# रत्नाबाई राठी हायस्कूल मध्ये जागतिक महिला दिन कार्यक्रम

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर**



श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचलित रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर येथे आज दिनांक 10 मार्चला आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या आजीवन सदस्या तथा शाळा समिती सदस्या सौ. भारतीताई काळे मॅडम उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समिती दर्यापूर येथील तलाठी पदावर कार्यरत असलेल्या रैनक शेख , नगरपरिषद मराठी मुलींची शाळा क्रमांक आठ येथे कार्यरत असलेल्या सहाय्यक शिक्षिका सौ.रेखाताई कळमखेडे मॅडम तसेच काशीबाई जाणे मुलींचे वस्तीगृह दर्यापूर येथील अधीक्षिका सौ. मंदाताई टोळे मॅडम व कुमारी प्राजक्ता शंके मॅडम सावित्री अभ्यासिका दर्यापूर च्या संचालिका उपस्थित होत्या. शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री विलासराव मुळे सर, शिक्षक प्रतिनिधी श्री श्रीकृष्ण करडे सर, ज्येष्ठ शिक्षक मा. श्री. विनोदरावजी मेश्राम सर, शिक्षिका प्रतिनिधी सौ. बुरघाटे मॅडम व ज्येष्ठ शिक्षिका सौ.कावडकर मॅडम हे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुतळ्याचे पूजन व हार अर्पण अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले. राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सो रेखाताई कळमखेडे मॅडम व रैनक शेख मॅडम हस्ते करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांच्या चे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. मान्यवरांच्या स्वागता नंतर शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक मा. श्री. विलासराव मुळे सर यांनी आपल्या प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या आयोजनाचा उद्देश विद्यार्थ्यांना समजून सांगितला. त्याचबरोबर उपस्थित सर्व मान्यवरांचा परिचय करून दिला. शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक विलासराव मुळे सर यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्ष व उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल, गुलाब पुष्प, सन्मानचिन्ह व भेट वस्तू देऊन सत्कार केला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी कु.प्राजक्ता शंके मॅडम यांनी आपल्या शालेय जीवनातील अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. त्याचबरोबर त्यांनी स्थापन केलेल्या सावित्री अभ्यासिकेमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची सवलत व मदत करण्यास तयार आहे .तेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासीकेचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आव्हान सुद्धा त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सौ. मंदाताई टोळे मॅडम यांनी वस्तीगृहातील मुलींच्या संदर्भातील आपले अनुभव सांगितले व मुलींनी जीवनामध्ये सक्षम होण्यासाठी आत्मविश्वासाने जगलं पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी रोनक शेख मॅडम यांनी आपल्या शालेय जीवनातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. शालेय जीवनात पहिल्या वर्गापासून तर पदवी शिक्षणापर्यंत त्यांनी सर्वच प्रकारांमध्ये प्रथम क्रमांकाने पास झाल्यात. अभ्यासात सातत्य ठेवून यश संपादन केले. अभ्यासाबरोबर प्रत्येक विद्यार्थ्याने खेळाचाआनंद घेत,अभ्यासाचा आनंद घेत जगले पाहिजे. नेहमीच आनंदी राहायला पाहिजे. भारतीय स्त्रियांची इतिहासातील परिस्थिती आणि आज स्त्रियांनी केलेला विकास विद्यार्थ्यांना समजून सांगिला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सौ. रेखाताई कळमखेडे मॅडम यांनी आपल्या शाळेतील पहिल्या वर्गापासून ते चौथ्या वर्गापर्यंत विद्यार्थ्यांनचे आलेले अनुभव व पुढील आयुष्यामध्ये त्यांना संरक्षणात्मक शिक्षण प्रधान झालं पाहिजे यावर भर दिला. त्याचबरोबर प्रत्येक महिलेने स्वतःचा सन्मान करणे शिकले पाहिजे तेव्हाच समाज आपला सन्मान करेल हा उपदेश सुद्धा दिला. शाळेतील शिक्षिका प्रतिनिधी सौ. अश्विनी बुरघाटे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना जागतिक महिला दिन या संदर्भात मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. भारतीताई काळे यांनी शाळेमध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व शिक्षिकाना भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार केला. समाजातील स्त्रियांची भूमिका व त्यांच्या समोरील अडचणी आणि अडचणी मात करत ते आपलं जीवन ज्या पद्धतीने सन्मानपूर्वक जगत आहे.हा एक मोठा तप आहे.

जोपर्यंत प्रत्येक स्त्रीचा सर्वांगीण असा विकास होणार नाही तोपर्यंत समाजाचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही .असे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक ,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील सहा. शिक्षक श्री. सुधीर पिसे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षक प्रतिनिधी श्रीकृष्ण करडे सर यांनी केले.

# पातुर्डा येथील शिक्षिकेच्या निर्घृण हत्या प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करा

## संग्रामपूर वकिल संघाची मागणी

**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर।**



तालुक्यातील पातुर्डा येथील शिक्षिका वृषाली प्रकाश गावंडे यांच्या निर्घृण हत्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी संग्रामपूर येथील दिवाणी-फौजदारी न्यायालय वकिल संघाने केली आहे. याबाबत संग्रामपूर तहसीलदारामार्फत महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे. कवठळ रोडवरील पेसोडा फाट्याच्या पुढे जळगाव जामोद पोलीस ठाण्याच्या हद्दीत बनावट अपघाताच्या नावाखाली लपविण्यात आलेल्या या निर्घृण खुनाचा कट जळगाव जामोद पोलिसांनी उघडकीस आणला आहे. या प्रकरणात सध्या तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत. गृहमंत्री यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मृत शिक्षिका वृषाली गावंडे यांच्या हत्येमागे त्यांचे पती व त्यांच्या साथीदाराचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासातून निष्पन्न झाले आहे. हा गुन्हा अत्यंत क्रूर व मानवतेला काळिमा फासणारा असल्याने समाजात संतापाची भावना निर्माण झाली आहे. या घटनेमुळे महिला सुरक्षेबाबतही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

सदर गुन्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात फौजदारी कट रचण्यात आला असल्याने या प्रकरणात आणखी आरोपी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या गंभीर गुन्ह्याची सखोल चौकशी उच्च पोलीस अधिकारी तसेच सीआयडीमार्फत करण्यात यावी आणि मृत शिक्षिका व त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

ही मागणी संग्रामपूर दिवाणी-फौजदारी न्यायालय वकिल संघाचे ॲड.नितीन, ॲड.एस.टी.कुरवाळे, ॲड.जी.ए.क्षीरसागर, ॲड.आर.एस.राऊत, ॲड.पी.के.तायडे, ॲड.वानखडे, ॲड.के.पी.बावस्कर, ॲड.एम.एस.किर्तने, ॲड.ए.एस.धामोळे, ॲड.निवृत्ती वाघ, ॲड.एस.एस.गोतमारे यांच्यासह वकिल संघाच्या सदस्यांनी केली आहे.

# यवतमाळमध्ये अवैध पिस्तुलासह इसम ताब्यात

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**





यवतमाळ : शहरात अवैधरित्या अग्नीशस्त्र बाळगून फिरणाऱ्या एका इसमाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेत त्याच्याकडून पिस्तुल जप्त केले आहे. ही कारवाई ११ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरात फरार व पाहिजे आरोपींच्या शोधासाठी गस्त घालत असताना पहाटे सुमारे २.०५ वाजता गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार एक इसम पांढऱ्या रंगाचा टी-शर्ट व पॅन्ट घालून कमरेला अवैध पिस्तुल खोचून भाग्यनगर डोर्ली परिसरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

माहितीची खातरजमा होताच पोलीस पथक दोन पंचांसह भाग्यनगर डोर्ली परिसरात रवाना झाले. तेथे रोडलगत असलेल्या मंगेश पान सेंटरसमोर एक इसम संशयास्पदरीत्या उभा असल्याचे दिसून आले. पोलिसांनी शिताफीने त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव इजाज शेख हसन शेख (वय ३४, रा. कुरेशीपुरा, कळंब चौक, यवतमाळ) असे सांगितले. पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला स्टील धातूचे पिस्तुल आढळून आले. या पिस्तुलाची किंमत अंदाजे ५० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. पोलिसांनी त्याच्याकडे शस्त्र बाळगण्याचा परवाना आहे का, याबाबत विचारणा केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे उघड झाले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे. पुढील तपास यवतमाळ शहर पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दत्ता पेंडकर, पोउपनि धनराज हाके तसेच पोलीस अंमलदार सुनील खंडागळे, सुधीर पांडे, निलेश निमकर, सुधीर पिदुरकर, रजनीकांत मडावी आणि नरेश राऊत यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# उन्हाळ्यात अशी घ्या आरोग्याची काळजी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



**■ उन्हाळ्यात आरोग्याशी संबंधित कोणतीही समस्या उद्भवल्यास नागरिकांनी तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन उपचार घ्यावेत, असे आवाहन श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत उईके तसेच जनऔषध वैद्यकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. उमेश एस. जोगे यांनी केले आहे.**
**- डॉ. उमेश एस. जोगे**
**प्राध्यापक व विभागप्रमुख,**
**जनऔषधवैद्यकशास्त्र विभाग**
**श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.t**

यवतमाळ : जिल्ह्यात उन्हाळ्याची सुरुवात झाल्याने तापमानात वाढ होत असून या काळात अनेक आरोग्यविषयक समस्या उद्भवण्याची शक्यता वाढते. कडक उन्हामुळे घाम येणे, शरीरातील पाण्याची कमतरता (डीहायड्रेशन), डोकेदुखी, अतिसार, बद्धकोष्ठता यांसारख्या तक्रारी निर्माण होऊ शकतात. योग्य काळजी न घेतल्यास चक्कर येणे, डोळ्यांत जळजळ होणे, ऊन लागणे तसेच उष्माघात होण्याचा धोका देखील वाढतो.

उन्हाळ्यात आरोग्य चांगले राखण्यासाठी शरीर हायड्रेट ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी दररोज किमान ८ ते १० ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे. तसेच आहारामध्ये हिरव्या पालेभाज्या, कोथिंबीर, ताजे फळे यांचा समावेश करावा. मसालेदार पदार्थ, जंक फूड, फास्ट फूड व चायनीज पदार्थांचे सेवन टाळावे. घरगुती पेयांमध्ये लिंबूपाणी, काकडीचा रस, ताक, मठ्ठा तसेच गोड शरबत यांचा समावेश केल्यास शरीराला आवश्यक द्रवपदार्थ मिळतात.

दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो उन्हात जाणे टाळावे. बाहेर जाताना टोपी, सनग्लासेस वापरणे तसेच हलक्या रंगाचे व सुती कपडे परिधान करणे फायदेशीर ठरते.

शेतकरी बांधवांनी शेतीची कामे शक्यतो सकाळी लवकर किंवा संध्याकाळी ५ नंतर करावीत, जेणेकरून कडक उन्हापासून बचाव होईल. तसेच उन्हाळ्याच्या दिवसात सामाजिक कार्यक्रम, लग्न समारंभ इत्यादी ठिकाणी मोठ्या संख्येने लहान मुले, महिला व वृद्ध व्यक्ती उपस्थित राहत असल्यामुळे आयोजकांनी शुद्ध पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करावी. यामुळे जलजन्य आजार टाळण्यास मदत होईल.

# तरुणीचा पाठलाग करून विनयभंग.

## आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**



शहरातील मंगळवार बाजार परिसरात एका २० वर्षीय महाविद्यालयीन तरुणीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी कारंजा रोडवरील आयटीआय (ITI) कॉलेजमध्ये शिक्षण घेते. गेल्या दोन महिन्यांपासून आरोपी किरण सुरेश कन्हेकर (वय २५, रा. दहातोंडा, ता. मूर्तीजापूर) हा तिचा सतत पाठलाग करत होता. दिनांक १० मार्च २०२६ रोजी संध्याकाळी ५:५० वाजेच्या सुमारास, पीडिता आपल्या पतीसोबत सियाराम कॉम्प्लेक्स समोरील रस्त्याने जात असताना, आरोपीने पुन्हा तिचा पाठलाग केला. यावेळी आरोपीने पीडितेच्या दिशेने बघून विनयभंग करण्याच्या उद्देशाने 'फ्लाईंग किस' (Flying Kiss) देऊन फोन कॉल करण्याचा इशारा केला. पतीला जीवे मारण्याची धमकी पीडितेने या प्रकाराबाबत तात्काळ आपल्या पतीला माहिती दिली. जेव्हा पीडितेच्या पतीने आरोपीला "माझ्या पत्नीचा पाठलाग का करतोस?" अशी विचारणा केली, तेव्हा आरोपी किरण कन्हेकर याने पतीला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.

**■ पोलीस कारवाई**

याप्रकरणी गायत्री संजय घुनारे (वय २०) यांच्या तक्रारीवरून मूर्तीजापूर शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध अपराध क्रमांक ३२०/२०२६, कलम ७४, ७८, ७९, ३५१(३), ३५२ भारतीय न्याय संहिता (BNS) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी HC इरफानौद्दीन ब.नं. १३३६ दाखल अधिकारी: HC शैलेश मेश्राम ब.नं. ६०८ पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी करत आहेत. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला असून, परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.

चंद्रपूर TODAY GOOD MORNING
BREAKING NEWS
दैनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी
गुरुवार, दि. 12 मार्च 2026

» Selected

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत जनजागृती



गडचिरोली :- राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२५-२०२६ अंतर्गत जनजागृती व प्रचार-प्रसारासाठी सुप्रसिद्ध मराठी अभिनेते भारत गणेशपुरे हे ११ मार्च 2026 रोजी ग्रामपंचायत दिभना (पं.स. गडचिरोली), ग्रामपंचायत देलोडा अंतर्गत मौजा बोडधा चक (पं.स. आरमोरी) आणि ग्रामपंचायत कोंढाळा (पं.स. देसाईगंज) येथे भेट देऊन ग्रामस्थांशी थेट संवाद साधले. त्यांच्या खास शैलीतून ते पंचायत राज व्यवस्थेचे महत्त्व पटवून देत ग्रामीण विकासातील लोकसहभागाबाबत जनजागृती केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामीण नागरिकांना सुलभ सेवा उपलब्ध करून देणे, आरोग्य, शिक्षण, उपजीविका व सामाजिक न्याय या क्षेत्रांमध्ये ग्रामपंचायतींचा सक्रीय सहभाग वाढविणे यावर भर देण्यात येत आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या कार्यक्षमतेत वाढ करणे, स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे तसेच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्यस्तरावर ५ कोटी रुपयांपर्यंतची पारितोषिके जिंकण्याची संधी मिळणार आहे. सुशासन, जलसमृद्धता, स्वच्छता, डिजिटल शिक्षण आदी सात प्रमुख घटकांवर गावांच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली गडचिरोली जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायती या अभियानात सहभागी झाल्या आहेत.

---

### मौजा फोदेवाडा जंगल परिसरात पोलीस नक्षल चकमकीत झालेल्या मृत्यूच्या शोध मोहिमेबाबत...

गडचिरोली:- उपपोलीस स्टेशन, लाहेरी अंतर्गत मौजा-फोदेवाडा जंगल परिसरात, दि. 5 फेब्रुवारी 2026 रोजी झालेल्या पोलीस-नक्षल चकमकी दरम्यान 7 नक्षल मृतदेह( 4 पुरुष 3 महिला) शस्त्रासह आढळुन आल्याचे व एक पोलीस शिपाई शहिद झाल्याचे कळविण्यात आले आहे. सदर घटनेतील मृत पावलेल्या व्यक्तींचे/ मृतदेहाचे कारणांचा शोध लावणे आवश्यक असल्याने, सदर प्रकरणात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 196 अन्वये दंडाधिकारीय चौकशी करावयाचे आहे. चौकशी मध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी पुढील मुद्यांना अनुसरुन आपले लेखी निवेदन शपथपत्रासह उपविभागीय दंडाधिकारी, एटापल्ली यांचे न्यायालयात जाहीर सूचना प्रसिद्धी झाल्यापासून 15 दिवसाचे आत किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

# स्मार्ट मीटरचा वीज पुरवठा खंडित झाल्यावर आता ग्राहकांना पुनर्जोडणीसाठी डोकेदुखी...!

## एकच महिन्याचे देयक थकल्यास बत्ती गुल ; पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

महावितरणने राज्यात मोठ्या प्रमाणावर बसवलेल्या स्मार्ट प्रीपेड मीटरमुळे (टाइम ऑफ डे मीटर) ग्राहकांना नव्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक ठिकाणी एकाच महिन्याचे वीज देयक थकताच वीजपुरवठा तात्काळ खंडित होत असल्याचा ग्राहकांचा आरोप आहे. देयक भरल्यानंतरही वीजपुरवठा सुरळीत व्हायला (पुनर्जोडणी) दोन दिवसांपर्यंत प्रतीक्षा करावी लागत असल्याच्या तक्रारी ग्राहकांच्या आहे. महावितरणने मात्र हे आरोप फेटाळले आहेत.

महावितरणने राज्यात स्मार्ट मीटर बसवण्याचा वेग वाढवला आहे. सध्या सुमारे ८८ लाख ५० हजार ग्राहकांकडे हे मीटर लावण्यात आले. मीटर लावल्यावर देयक थकल्यास वीजपुरवठा रिमोट पद्धतीने तात्काळ खंडित करता येतो. २० ते २६ फेब्रुवारीदरम्यान राज्यातील २ लाख ४५ हजार ५४७ ग्राहकांचा वीजपुरवठा देयक न भरल्यामुळे एकाच वेळी खंडित करण्यात आला होता.

यापैकी अनेक ग्राहकांचे केवळ एकाच महिन्याचे वीज देयक थकीत होते, असा आरोप ग्राहक संघटनेचा आहे. देयक भरण्याबाबत भ्रमणध्वनीवर संदेशाद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या,असा दावा महावितरणकडून करण्यात आला असला, तरी अनेकांना अशी कोणतीही सूचना मिळाली नसल्याचा आरोप केला आहे.

हे देयक भरल्यावर दोन दिवस पुरवठा सुरळीत झाला नसल्याच्या ग्राहकांच्या तक्रारी आहेत. कुठल्याही पूर्वसूचना न देता थेट वीजपुरवठा खंडित करण्याचा अधिकार कंपनीला आहे का ? असा



सवाल ग्राहकांनी केला.

नागपूरसह राज्यातील विविध महावितरण कार्यालयांत ग्राहकांनी जाऊन याबाबत नाराजी व्यक्त केली. ग्राहक संघटनांच्या मते, पूर्वी वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी ग्राहकांना नोटीस देऊन काही प्रमाणात मुदत दिली जात असे. मात्र स्मार्ट प्रीपेड मीटरमुळे एकच महिन्याचे बिल थकल्यास तात्काळ वीजपुरवठा खंडित केला जात आहे. तसेच देयक भरल्यानंतरही वीजपुरवठा लगेच सुरू होत नसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

> “ स्मार्ट प्रीपेड मीटरच्या ग्राहकांनी थकीत देयक भरल्यावरही दोन ते तीन दिवस पुरवठा सुरळीत झाला नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे ग्राहक महावितरण कार्यालयात येऊन वीज कर्मचाऱ्यांवर संताप व्यक्त करतात. प्रत्यक्षात हा मीटरचा दोष असून त्यात कर्मचाऱ्यांचा दोष नाही. या मीटरला आमचाही विरोध आहे.
>
> **- मोहन शर्मा, राज्य अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन.**

> “ स्मार्ट प्रीपेड मीटरमुळे ग्राहकांची गळचेपी होईल, असे आम्ही सुरुवातीपासून सांगत आहोत. त्यामुळे या मीटरला आमचा ठाम विरोध आहे. ग्राहकांनी थकीत देयक भरल्यानंतरही एक-दोन दिवस वीजपुरवठा सुरू न करणे गंभीर बाब आहे. हा मुद्दा उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेत मांडला जाईल.
>
> **- प्रशांत दर्यापूरकर, विदर्भ अध्यक्ष, महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना.**

> “ स्मार्ट मीटरमध्ये मानवी हस्तक्षेप नसल्यामुळे पारदर्शकता वाढली आहे. देयकाची मुदत संपल्यानंतर ग्राहकांना भ्रमणध्वनीवर तत्काळ सूचना पाठवली जाते. ग्राहकाने वीज देयक भरताच साधारणतः १५ ते २० मिनिटांत स्वयंचलित पद्धतीने वीजपुरवठा सुरू होतो. काही ग्राहकांना वेगळ्या कारणांमुळे पुरवठा सुरळीत झाला नसल्यास समस्या सोडवली जाईल.
>
> **- भारत पवार, मुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, मुंबई**

## भाकपाच्या ५ दिवसीय सिरोंचा तालुका दौऱ्या दरम्यान रंगय्यापल्ली येथे जनतेच्या प्रश्नांवर चर्चा

**विदर्भ केसरी ।सिरोंचा**

भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकपा) च्या ५ दिवसीय सिरोंचा तालुका दौऱ्यादरम्यान रंगय्यापल्ली गावाला भेट देऊन नागरिकांशी संवाद साधण्यात आला. या भेटीत ग्रामस्थांनी अनेक महत्त्वाचे प्रश्न मांडले. मुख्यतः जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना गावात सुरूच झालेली नसल्याची बाब ग्रामस्थांनी मांडली. पाण्याची टाकी व पाईपलाईनचे काम झाल्यानंतरही प्रत्यक्षात गावात पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. आता उन्हाळ्याचा काळ सुरू झाल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणी निर्माण होऊ शकतात, अशी चिंता गावकऱ्यांनी व्यक्त केली. यावर कॉ. सचिन मोतकुरवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून लवकरात लवकर पाण्याची



टाकी सुरू करून गावात सुरळीत पाणीपुरवठा व्यवस्था करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे सांगितले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) रंगय्यापल्ली अंतर्गत अनेक पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांना योग्य आरोग्य सेवा मिळण्यात अडचणी येत असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. औषधांची कमतरता आणि कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे. या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याशी फोनद्वारे संपर्क साधून परिस्थितीची माहिती देण्यात आली. त्यांनीही लवकरच रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी तालुका सचिव कॉ. रवी बारसंगडी, जिल्हा कार्यकारिणी सदस्य कॉ. सुरज जक्कुलवार तसेच ग्रामपंचायत रंगय्यापल्ली येथील भाकपा अध्यक्ष लक्ष्मीनारायण आडेटी तसेच गावकरी उपस्थित होते. जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर भारतीय कम्युनिस्ट पक्ष नेहमीच संघर्ष करत राहील.

## जिल्ह्यात गॅस सिलेंडरचा पुरेसासाठा उपलब्ध

### कृत्रिम तुटवडा निर्माण केल्यास कडक कारवाई –जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून गॅस पुरवठ्यात कोणतीही अडचण नसल्याची माहिती जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी दिली. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा किंवा इतर कोणत्याही कारणाचा आधार घेत कृत्रिम तुटवडा असल्याचे भासवणे, अफवा पसरवणे किंवा सिलेंडरचा काळाबाजार करण्याचा प्रयत्न केल्यास संबंधितांवर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. जिल्हाधिकारी कार्यालयात भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपन्यांच्या जिल्ह्यातील वितरकांची आढावा बैठक पार पडली. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी सुधाकर पवार, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. गोकुल, निवासी उपजिल्हाधिकारी आशिष वानखेडे तसेच हिंदुस्तान पेट्रोलियमचे जिल्हा मुख्य वितरक आकाश गौर यांच्यासह संबंधित वितरक उपस्थित होते.

बैठकीत वितरकांकडून जिल्ह्यात एलपीजी गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती प्रशासनाला देण्यात आली. वापरासाठीच्या गॅस सिलेंडरवर काही निर्बंध लागू करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा, रुग्णालये आदी अत्यावश्यक सेवांसाठी प्राधान्याने सिलेंडर उपलब्ध करून देण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. सर्व गॅस वितरकांनी संबंधित कंपनीशी समन्वय ठेवून गॅस पुरवठा सुरळीत ठेवावा. तसेच कोणत्याही चुकीच्या संदेशांमुळे किंवा अफवांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणार नाही याची विशेष काळजी घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. कंपन्यांनी दररोजचा उपलब्ध गॅस साठा जिल्हा पुरवठा कार्यालयास कळवावा, नागरिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी गॅस एजन्सींनी आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात टोल-फ्री क्रमांकासह माहिती फलक लावावेत, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. नागरिकांनी त्यांच्या अडचणी व तक्रारी शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या ०७१३२-२२२००७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# सुपीक जमीन अधिग्रहणाच्या विरोधात १२ मार्चला धरणे- मुंडन आंदोलन

## संत मुरलीधर महाराज स्वतः मुंडन करणार ; भेंडाळा येथील प्रकरण ; काँग्रेसचा जाहीर पाठिंबा...

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

चामोर्शी तालुक्यातील भेंडाळा परिसरात प्रस्तावित जेएसडब्ल्यू प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या सुपीक शेतजमिनी अधिग्रहित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या भूसंपादनाला स्थानिक शेतकरी व नागरिकांकडून तीव्र विरोध होत असून या विरोधाला आता आंदोलनाचे स्वरूप येत आहे. भेंडाळा परिसरातील सुपीक शेतजमिनी एमआयडीसी व औद्योगिक प्रकल्पासाठी अधिग्रहित करू नयेत, या प्रमुख मागणीसाठी शेतकरी बचाव जनआंदोलन समितीच्या वतीने १२ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे धरणे व मुंडन आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या आंदोलनाला गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीने जाहीर पाठिंबा दिला आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले



की, प्रशासनाकडून शेतकऱ्यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न झाल्यास काँग्रेसच्या वतीने आगामी काळात ‘जेल भरो आंदोलन’ करण्यात येईल. तसेच काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होऊन शेतकऱ्यांच्या हक्कासाठी उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले. या पत्रकार परिषदेला माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मनोहर पोरेटी, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव ॲड. विश्वजीत कोवासे, गडचिरोली तालुका अध्यक्ष वसंत राऊत, चामोर्शी तालुका अध्यक्ष प्रमोद भगत, धानोरा तालुका अध्यक्ष प्रशांत कोराम, जिल्हा उपाध्यक्ष समशेरखा पठाण, नेताजी गावतुरे, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष नितेश राठोड, अनिल कोठारे, किसान सेल अध्यक्ष वामनराव सावसागडे, प्रभाकर वासेकर, परिवहन सेल जिल्हाध्यक्ष रुपेश टिकले, श्रीनिवास ताडपलीवार, संजय गावडे, संजय चन्ने, हरबाजी मोरे, दिवाकर निसार, धीवरू मेश्राम, हेमंत मोहितकर, स्वप्निल बेहेरे, कल्पना नंदेश्वर, कविता उराडे, पौर्णिमा भडके, रिता गोवर्धन, मंजू आत्राम, मीनल चिमूरकर, शीतल ठवरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी आरोप केला की, गडचिरोलीचे जिल्हाधिकारी अविष्यांत पांडा हे सरकारमधील काही लोकांच्या आदेशाची पूर्तता करण्यासाठी हिटलर सारखे मनमानी पद्धतीने आदेश काढत असल्यामुळे भूसंपादन होणाऱ्या परिसरात नागरिकांमध्ये मोठा आक्रोश निर्माण झाला आहे. सरकार तसेच खाण माफियांच्या हितासाठी प्रशासन प्रयत्न करीत असल्याचा आरोप करत जिल्हाधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली. तसेच १२ मार्च रोजी होणाऱ्या या आंदोलनात हरणघाट मंदिराचे धर्माचार्य संत मुरलीधर महाराज देखील सहभागी होणार असून सरकारच्या निषेधार्थ ते स्वतःचे मुंडन करून आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली. भेंडाळा परिसरातील सुपीक जमीन अधिग्रहणाच्या मुद्द्यावरून आता जिल्ह्यात मोठे आंदोलन उभे राहण्याची चिन्हे दिसत असून प्रशासन या आंदोलनाबाबत कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# एच.पी.व्ही. (HPV) लसीकरण पूर्णपणे सुरक्षित

## अफवांकडे दुर्लक्ष करा; गडचिरोली आरोग्य विभागाचे आवाहन...

**विदर्भ केसरी । फुलचंद वाघाडे..**

गडचिरोली :- जिल्हा परिषदेच्या शहीद वीर बाबुराव शेडमाके हॉल येथे आयोजित पत्रकार परिषदेत 'एच.पी.व्ही.' (HPV) लसीकरण मोहिमेबाबत आरोग्य विभागाने महत्त्वपूर्ण माहिती दिली. या परिषदेत लसीकरणाबाबत समाजात पसरलेल्या विविध शंका व अफवांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, प्रशासनाने हे लसीकरण पूर्णपणे सुरक्षित असल्याचे ठामपणे स्पष्ट केले आहे.

लसीकरण मोहिमेचा मुख्य उद्देश आणि खात्री__ या मोहिमेच्या नियोजनावर प्रकाश टाकताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे म्हणाले, "ही मोहीम पूर्णपणे शासनाच्या नियमांनुसार



आणि तज्ज्ञांच्या देखरेखीखाली राबवण्यात येत आहे. आम्ही केवळ लसीकरण करत नाही आहोत, तर त्यासोबत जनजागृतीही करत आहोत. लसीकरणाबाबत पसरवल्या जाणाऱ्या अफवांना पालकांनी बळी पडू नये. ही लस मुलींच्या आरोग्याचे एक मजबूत सुरक्षा कवच आहे, त्यामुळे सर्व पालकांनी आपल्या मुलींचे लसीकरण करून घेणे हिताचे आहे." लसीच्या सुरक्षिततेबाबत आणि वैद्यकीय दृष्टिकोनातून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा लहाडे यांनी पालकांना आश्वस्त केले: "एक डॉक्टर म्हणून मी पालकांना खात्री देते की, ही लस जागतिक दर्जाच्या मानकांनुसार सुरक्षित आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचा (Cervical Cancer) धोका टाळण्यासाठी ही लस अत्यंत प्रभावी आहे. सुरुवातीला मनात काही भीती असू शकते, परंतु शास्त्रशुद्ध माहिती घेतल्यास ती दूर होते. पालकांनी कोणत्याही अफवांकडे दुर्लक्ष करून आपल्या मुलींच्या भविष्यातील आरोग्यासाठी या मोहिमेत सहभागी व्हावे."

पत्रकार परिषदेचे प्रमुख मुद्दे__

अफवांचे खंडन: सोशल मीडियावर फिरणाऱ्या लसीच्या दुष्परिणामांच्या पोस्ट्स चुकीच्या असून त्याला कोणताही वैज्ञानिक आधार नाही.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन: परिषदेत डॉ. प्रशांत आखाडे यांनी लसीचे महत्त्व आणि गर्भाशयाच्या कर्करोगापासून बचावाचे महत्त्व स्पष्ट केले.

प्रशासन सज्ज: लसीकरणासाठीची वितरण आणि प्रत्यक्ष लसीकरण प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक हाताळली जात असल्याची ग्वाही देण्यात आली.


## गडचिरोली जिल्हाधिकाऱ्यांकडून कामांचा तपशील सादर करण्याचे निर्देश..!

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेला निधी वेळेत व नियोजनबद्ध पद्धतीने खर्च करणे अत्यावश्यक असून, निधी अखर्चित राहिल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी दिला. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामांच्या खर्चाचा आढावा घेण्यासाठी जिल्हा नियोजन सभागृह, गडचिरोली येथे आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी पंडा बोलत होते. यावेळी विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी पंडा यांनी विभागनिहाय निधी वितरण व खर्चाचा सविस्तर आढावा घेतला. ज्या विभागांनी मोठ्या प्रमाणात निधीची मागणी केली होती, परंतु प्रत्यक्षात खर्च अल्प प्रमाणात झाल्याचे निदर्शनास आले, त्याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली. मंजूर निधीचा योग्य वापर करून मार्च अखेरपर्यंत संपूर्ण निधी खर्च करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी संबंधित विभागांना दिले.

तसेच जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक विभागाने मंजूर निधीचा वापर कोणत्या कामांवर व कोणत्या टप्प्यावर झाला आहे, याचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिले. मार्च अखेरपर्यंत निधी खर्चाचे उद्दिष्ट पूर्ण होईल याची खात्री करण्यासाठी विभागनिहाय प्रगतीचा सतत आढावा घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी यांना सर्व विभागांना मंजूर निधीचे संपूर्ण वितरण झाले आहे की नाही, याची पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच ज्या विभागांनी अपेक्षेप्रमाणे निधी खर्च केलेला नाही, अशा विभागांना लेखी पत्राद्वारे कारणे विचारण्याची कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले. बैठकीत जिल्हाधिकारी पंडा यांनी स्पष्ट केले की, काम अपूर्ण असल्याचे कारण देऊन निधी खर्च न करणाऱ्या विभागांना पुढील आर्थिक वर्षात निधी वितरणात मर्यादा येऊ शकतात. त्यामुळे सर्व विभागांनी कामांची गती वाढवून मंजूर निधी वेळेत खर्च करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी प्रसाद घाडगे यांनी विभागनिहाय माहितीचे सादरीकरण केले.

गडचिरोली TODAY GOOD MORNING
BREAKING NEWS



दैनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी
गुरुवार, दि. 12 मार्च 2026



» Selected

### गडचिरोलीतील 14 गावांच्या जमीन अधिग्रहणाचा मुद्दा विधानपरिषदेत गाजला...!

गडचिरोली :- जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात प्रस्तावित असलेल्या स्टील प्रकल्पासाठी करण्यात येत असलेल्या जमीन अधिग्रहणाचा मुद्दा आमदार अभिजीत वंजारी यांनी विधिमंडळाच्या विधानपरिषद सभागृहात उपस्थित केला. जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या नव्या अधिसूचनेनुसार चामोर्शी तालुक्यातील 14 गावांमधील सुमारे 3,504 हेक्टर जमीन जेएसडब्ल्यू स्टील कंपनीच्या प्रस्तावित स्टील प्लांटसाठी अधिग्रहित करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. गडचिरोली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे 14.48 लाख हेक्टर असून त्यापैकी जवळपास 10.98 लाख हेक्टर क्षेत्र वनजमीन आहे. शेतीसाठी उपलब्ध असलेली जमीन केवळ 2 लाख 14 हजार हेक्टर इतकीच आहे. यापैकी सिंचनाखालील क्षेत्र अत्यंत मर्यादित असून फक्त 0.67 लाख हेक्टर जमीनच सिंचनाखाली असल्याचे वंजारी यांनी सांगितले. अशा परिस्थितीत औद्योगिक प्रकल्पांसाठी वारंवार सुपीक शेती जमीनच अधिग्रहित का केली जाते, असा सवाल स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या जमीन अधिग्रहणाची सातवी टप्प्याची प्रक्रिया सुरु असून यापूर्वीही अनेक टप्प्यांमध्ये अशाच प्रकारे जमीन अधिग्रहित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. चामोर्शी तालुक्यातील संबंधित 14 गावांतील ग्रामस्थांनी या अधिग्रहणाविरोधात ठराव पारित केले आहेत. ग्रामस्थांचा विकासाला विरोध नसून, प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळेल असे आश्वासन यापूर्वी देण्यात आले होते; मात्र अपेक्षित प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला नसल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तावित जमीन अधिग्रहणाचा पुनर्विचार करून प्रकल्पासाठी पर्यायी जागा शोधण्याचा विचार करावा, जेणेकरून गावकऱ्यांची सुपीक शेती जमीन वाचेल, अशी मागणी आमदार अभिजीत वंजारी यांनी सभागृहात केली. तसेच या विषयावर सविस्तर चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा, अशी विनंतीही त्यांनी सरकारकडे केली.

---

### यापुढे जमीन मोजणीधारकांची कमतरता येणार नाही

मुंबई-: भूमी अभिलेख विभागासंदर्भात आता आकृतीबंध तयार झाला असून १०,६८३ भूमापक पदे निश्चित करण्यात आली आहेत. जमीन मोजणीदारांची कमतरता यापुढे राहाणार नाही.प्रत्येक भूमापकाकडे एक रोव्हर असेल अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचना उत्तरात दिली. गोपीचंद पडळकर यांनी ही लक्षवेधी सूचना मांडली होती.भूमी अभिलेख विभाग कर्मचारी आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करण्याच्या पवित्र्यात आहेत. सध्या जे रोव्हर दिले ते जुने असून सदोष आहेत याकडे त्यांनी लक्ष वेधले. महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले,प्रशिक्षीत भूमापक कर्मचारी यांची तसेच रोव्हर ची कमतरता नसेल. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती याबाबत दक्षता घेईल.खासगीकरणाचा विचार नाही. तीस दिवसांत जमीन मोजणी,खरेदीखत संबंधी काम पूर्ण केले जाईल.

---

### बोगस मतदान प्रकरणात गिरीश गांधींवर कारवाई करा


गडचिरोली : विदर्भ साहित्य संघाच्या निवडणूक प्रक्रियेला गालबोट लागले असून, आरमोरी येथे मतदारांच्या मतपत्रिका परस्पर पळवून बोगस मतदान करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी स्थानिक मतदारांनी आरमोरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन अध्यक्षपदाचे उमेदवार गिरीश गांधी, टपाल विभागाचे कर्मचारी आणि संबंधित उमेदवाराच्या समर्थकांविरुद्ध लेखी तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे साहित्य वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीसाठी आरमोरी येथील मतदारांच्या १० मतपत्रिका 'स्पीड पोस्टा'ने पाठवण्यात आल्या होत्या. मात्र, या मतपत्रिका संबंधित मतदारांना वितरित न करता त्या परस्पर एका त्रयस्त व्यक्तीच्या स्वाधीन करण्यात आल्या. आरमोरीच्या पोस्ट मास्तरांनी यासंदर्भात लेखी कबुली दिली असून, संबंधित पोस्टमनने कोणाच्या तरी दबावाखाली किंवा प्रलोभनाला बळी पडून हे कृत्य केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, चोरीला गेलेल्या या १० मतपत्रिकांपैकी चार मतपत्रिकांवर आधीच बोगस मतदान करून त्या मतपेटीत टाकण्यात आल्याचेही समोर आले आहे.या संपूर्ण प्रकरणामागे संघटित कारस्थान असल्याचा आरोप तक्रारदार डॉ. महेश कोपुलवार आणि विजयकुमार ठवरे यांनी केला आहे.

# अमरावती आंतरराष्ट्रीय ड्रग्स तस्करीचे हब !

## डीआरआय ने केला पर्दाफाश तरीही पोलीस विभाग ठप्प -आ. संजय खोडके

**विदर्भ केसरी । मुंबई**

फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यातमध्ये महसूल गुप्तचर संघटनेने अमरावती शहरात धाड टाकून १० कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त जप्त करीत शहरातील ड्रग्स तस्करीचा पर्दाफाश केला. या गंभीर प्रकरणाला घेऊन राज्यअधिवेशनात लक्षवेधी लावत असतांना हा विषय संबधित विभागाकडे जातात नुकतीच महाराष्ट्र पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाने धाड टाकीत अमरावती शहरातून ३ कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त केला. अमरावती शहर आंतरराष्ट्रीय एम.डी.ड्रग्स तस्करीचे हब बनत असतांना मात्र अमरावती शहर पोलीस, संबंधित विभाग व पोलीस स्टेशन हे ठप्प बसले आहेत. असे सांगून आमदार संजय खोडके यांनी शहरातील एम.डी. ड्रग्स तस्करीबाबत राज्यविधिमंडळातून सर्जिकल स्ट्राईक केली. राज्यविधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासांमध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावती मधील एम.डी. ड्रग्स तस्करीला प्रतिबंध घालण्यासाठी शासनाचे काय धोरण आहे ? असा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी संभागृहा समक्ष सांगितले कि, अमरावती शहरामध्ये फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यामध्ये महसूल गुप्तचर संघटनेने अमरावती शहरात धाड टाकून १० कोटींचा एम.डी.



ड्रग्स साठा जप्त केला. यावेळी त्यांनी शहर पोलीस विभागाला माहिती देऊन ही कारवाई केली. यापूर्वी सुद्धा अमरावती शहरात एका वर्षात २० गुन्हे दाखल करण्यात आले आहे. अमरावती शहरात काही टोळी सक्रिय असून त्या शहरातील विविध भागात ड्रग्स ची विक्री करत असतात. मात्र ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये ड्रग्स विक्री होते , तेथील पोलीस मात्र याबाबत ठप्प असून अमरावती शहरात पोलिसातील बडे अधिकारी यांचे सुद्धा याकडे दुर्लक्ष करत असल्याने अमरावती शहर ड्रग्स तस्करीचे हब बनत चालले असल्याचे आ. संजय खोडके यांनी सभागृहा समक्ष स्पष्ट केले. या संदर्भात आपण अधिवेशनात लक्षवेधी लावून धरत असतांना जेव्हा हा विषय संबंधित विभागाकडे जातो, त्यानंतर लगेच अमरावती शहरात गुन्हे शाखेने धाड टाकून नागपुरी गेट ठाण्या हद्दीतून ३ कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त केला. ज्या पोलीस स्टेशन मध्ये धाडी करण्यात आल्यात, त्यात गुन्हे शाखेने कारवाई केली. परंतु संबंधित पोलीस स्टेशन व अधिकारी मात्र ठप्प बसले असल्याने यामध्ये अमरावती पोलीस विभागातील बडे अधिकाऱ्यांचे साटेलोटे आहे का ? असा प्रश्न उपस्थित करून आ. संजय खोडके यांनी अमरावती शहराच्या पोलीस प्रशासनात नव्याने बदल करण्याची गरज असल्याचे सभागृहासमक्ष सांगितले. मागील अधिवेशनातही अमरावती मधील एम.डी. ड्रग्स प्रकरणाबाबत लक्षवेधी मांडली असता ,यावर शासनाच्या वतीने योग्य धोरण ठरविणार असल्याचे सांगण्यात आले होते. आता यासंदर्भात निर्णय घेणार का ? असा प्रश्न सुद्धा अधिवेशनातून करण्यात आला. यावर शासनाच्या वतीने उत्तर देतांना राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले कि, अमरावती शहरात डीआरआय तसेच क्राईम ब्रँच मार्फत एम. डी. ड्रग्सबाबत कारवाई करण्यात आली. हे खरे असून पोलीस स्टेशन स्तरावर सुद्धा कारवाई होत आहे. राज्यातील प्रमुख शहरांमध्ये प्रामुख्याने महानगर पालिकांच्या हद्दीमध्ये नवीन फोर्स तयार करून कार्यवाही करण्यात येत आहे. एम.डी. ड्रग्स विरोधी कारवाई व प्रतिबंध लावण्याला घेऊन महानगर स्तरावर ए.एन.डी.एफ. स्थापन करण्यात आले असल्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी शासनाच्या वतीने आपल्या उत्तरात म्हटले आहे.

# महिला शेतकरी अधिकार कायद्याच्या अभ्यासासाठी कृतीगट तयार करावा

## शेतीपूरक व्यवसायांसाठी महिलांना विशेष अनुदान : उपमुख्यमंत्री पवार

**विदर्भ केसरी । मुंबई**

महिला शेतकरी हक्क कायद्याबाबत ११ मे २०१२ रोजी राज्यसभेत खासगी विधेयक सादर करण्यात आले, या महिला शेतकरी अधिकार विधेयकावर अभ्यास करण्यासाठी कृतीगट स्थापन करण्याची गरज असल्याचे विधानपरिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६ आणि जागतिक महिला दिनानिमित्त विधानभवनात 'महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, डॉ. सौम्या स्वामिनाथन आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीच्या प्रमुख मोनिका राजळे, आमदार



ज्योती गायकवाड, मंजुळा गावित आणि डॉ. नित्या राव यांनी यावेळी आपले विचार मांडले. पसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महिला शेतकऱ्यांच्या नावावर जमीन व मालमत्ता नोंदणीला प्रोत्साहन देणे तसेच महिला शेतकरी हक्कांसाठी कायदेशीर संरक्षणाची गरज डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली. याखेरीज महिला शेतकरी कोष निर्माण करण्यात यावा. आपत्तीच्या काळात संकटग्रस्त महिला शेतकऱ्यांची जमीन बळकावण्याचे प्रकार घडतात, त्यामुळे अशा परिस्थितीत शेतकरी महिलांच्या जमिनीचे संरक्षण करण्यासाठी विशेष उपाययोजना करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढत असल्याने शेतीची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर महिलांवर येत आहे. अनेक कुटुंबांमध्ये महिला कुटुंबप्रमुख म्हणून शेती सांभाळत आहेत. मात्र प्रत्यक्ष शेती करणाऱ्या महिलांचे नाव सातबाऱ्यावर नसल्याने त्यांना शासकीय योजना, कर्ज आणि इतर सुविधांचा लाभ मिळण्यात अडचणी येतात. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांना शेतकरी म्हणून अधिकृत प्रमाणपत्र देण्याचा विषय आपण अनेक वर्षांपासून मांडत आहोत, परंतु त्यासंबंधीचा प्रस्ताव प्रशासनाकडे प्रलंबित असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. महिलांना संपत्ती आणि शेतीवरील हक्क मिळण्यासाठी विवाह नोंदणी प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे. तसेच महिलांच्या नावाने जमीन व मालमत्ता नोंदणीला प्रोत्साहन देणे आणि शेतकरी महिलांच्या श्रमाचे मूल्य मान्य करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले. शेती, पशुपालन आणि वनशेतीसारख्या क्षेत्रांमध्ये महिलांचे मोठे योगदान असून त्यांना तंत्रज्ञान, कर्जसुविधा आणि प्रशिक्षण उपलब्ध करून दिल्यास त्यांचे सक्षमीकरण अधिक प्रभावी होईल.

# २०४७ साली महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन : मुख्यमंत्री फडणवीस

**विदर्भ केसरी । मुंबई**

महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेत अडचणीतही मार्ग काढण्याची क्षमता आहे.कारण हे आर्थिक शिस्त पाळणारे राज्य आहे. कर्जाच्या कितीतरी पट आपली भांडवली गुंतवणूक आहे.सन २०३०-३१ मध्ये एक ट्रिलियन डॉलर आणि २०४७साली आपली अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर ईतकी निश्चित होणार आहे असा दुर्दम्य आत्मविश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना विधानसभेत व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुमारे सव्वा तास आकडेवारीनिशी विरोधी पक्षीय सदस्यांनी केलेले आरोप व शंकांना उत्तर देताना २०१३-१४साली कर्ज प्रमाण १७टक्के होते.कोविड काळात अतिरिक्त कर्ज घेतले त्यामुळे ते आता साडेअठरा टक्के आहे. कर्जाच्या कितीतरी पटीने आपली भांडवली गुंतवणूक वाढली आहे अशी माहिती दिली.२०१३-१४साली



राज्याला केंद्राला मिळणारा हिस्सा १६हजार५९८कोटी रुपये होता. २०२५-२६ साली ८५ हजार कोटी रुपये इतका म्हणजे पाचपट आहे असा टोलाही त्यांनी लगावला. महसुली जमेचे प्रमाण २०१३-१४साली १लाख ५५हजार कोटी रुपये होते ते आता ६लाख १६ हजार कोटी रुपये इतके वाढले. कर्जाच्या कितीतरी पट भांडवली गुंतवणूक राज्याची वाढली असेही त्यांनी सांगितले.राजकोषीय तूट तीन टक्केच्या आत असली पाहिजे.ती आपली २.७८टक्के आणि महसुली तूट १टक्केच्या आत म्हणजे प्रमाणातच आहे असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. अहिल्यादेवी होळकर यांचा अहिल्यामाता असा गौरवपर उल्लेख करताना सहासष्ट वर्षे सत्तेवर असणाऱ्यांना अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करता आले नाही अशी कोपरखळीही त्यांनी दिली. ते म्हणाले, उर्जा क्षेत्रात राबविलेल्या धोरणांमुळे यापुढे प्रतिवर्षी १.२टक्के वीज दर कमी होतील.२०३०साली राज्याची वीज निर्मिती क्षमता ८२ हजार मेगावॅट होईल. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ५५पुरस्कार राज्याला प्राप्त झाले.राज्याने आतापर्यंत ५७ लाख हेक्टर सिंचन क्षमता प्राप्त केली आहे.नदीजोड प्रकल्पांवरही वेगाने काम होत आहे.उल्हास खो-यातील पाणी मराठवाड्यात पोहचविण्यात येईल.दमणगंगा-पिंजाळ प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे.वैनगंगा प्रकल्पाचे लक्ष्य ६३ टीएमसी आहे. टेन्डर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. गार्गाई प्रकल्पातून मुंबईलाही पाणी मिळणार आहे अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.सोलापूर जिल्ह्यात आयटी पार्कसाठी जागा चिन्हांकित केली.सोलापूर येथे विमाने रात्रीही उतरण्यासंदर्भात बोलणी अंतिम टप्प्यात आहेत. साखर उद्योगांपुढील समस्यांबाबत आपण लवकरच बैठक घेऊ असे आश्वासन त्यांनी दिले.

# चंद्रपुरात बनावट नोटांचा कारखाना उघड

## 91 लाखांच्या रंगीत छायांकित नोटा जप्त, आंतरराज्यीय टोळीचा भांडाफोड...!


**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

चंद्रपूर :- शहरातील उर्जानगर परिसरात बनावट चलन तयार करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश करत सुमारे ९१ लाख १५ हजार रुपयांच्या ५०० रुपयांच्या रंगीत छायांकित नोटा व साहित्य जप्त केले आहे.

या प्रकरणी मध्यप्रदेशातील एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. १० मार्च २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी चंद्रपूर शहरात पेट्रोलिंग करीत असताना उर्जानगर येथील मेजर गेटजवळ असलेल्या राजश्री अपार्टमेंटमधील फ्लॅट क्रमांक २०३ मध्ये काही इसम अवैधरित्या ५०० रुपयांच्या रंगीत छायांकित नोटा तयार करीत असल्याची माहिती मिळाली.

माहितीची खातरजमा करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने सापळा रचत संबंधित ठिकाणी छापा टाकला. छाप्यावेळी फ्लॅटला कुलूप लागलेले आढळून आले. त्यानंतर फ्लॅटचे मालक सुमित कालीपथ पॉल रा. बंगाली कॅम्प, चंद्रपूर यांना बोलावून माहिती घेतली असता त्यांनी हा फ्लॅट मागील एक महिन्यापासून मध्यप्रदेशातील काही व्यक्तींना भाड्याने दिल्याचे सांगितले. त्यानंतर फ्लॅटचे कुलूप तोडून झडती घेण्यात आली.

झडतीदरम्यान बेडरूममध्ये ठेवलेल्या १० बॉक्समध्ये भारतीय चलनी नोटांसारख्या दिसणाऱ्या ५०० रुपयांच्या रंगीत छायांकित नोटा, तसेच EPSON कंपनीचा कलर प्रिंटर व अन्य साहित्य आढळून आले. या कारवाईत एकूण ९१ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यानंतर भाड्याने राहणाऱ्या संशयितांचा



शोध घेत शुभम दिनेश नागर (२६), रा. पंचेड, तहसील रतलाम, जि. रतलाम, मध्यप्रदेश याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीने फसवणुकीच्या उद्देशाने बनावट रंगीत छायांकित नोटा तयार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी दुर्गापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १९६/२०२६ नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१८ (२), ३१८(३), ३३६ (२), ३३६ (३) व १८२ (१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास दुर्गापूर पोलीस करीत आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले, परिविक्षाधीन पोलीस अधीक्षक गौरव कायंदेपाटील, पोलीस निरीक्षक अमोल काचोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक काँक्रिडवार, बलराम झाडोकर, पोलीस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, सर्वेश बेलसरे, सुनील गौरकर, पो.हवा. जयसिंह, सचिन गुरनुले, संतोष येलपूलवार, गणेश मोहुर्ले, नितीन रायपूरे, रजनीकांत पुट्टावार, पोअं. किशोर वकाटे, अजित शेंडे, चालक पो.हवा. दिनेश उराडे, प्रमोद इंभारे, महिला पो.हवा. निराशा तितरे, विजयमाला वाघमारे, छाया निकोडे, अपर्णा मानकर म.पो.अं. दिपीका सोडनार, उषा लेडांगे यांनी केले.

# बस्तरमध्ये 'लाल दहशती'ला मोठा हादरा !

**विदर्भ केसरी । मुंबई**

छत्तीसगडमधील बस्तरमध्ये नक्षलवादाच्या मुळावर घाव घालण्यात सुरक्षा दलांना मोठे यश आले आहे. ११ मार्च रोजी 'पुनर्वसन ते पुनरुत्थान' या मोहिमेतंर्गत तब्बल १०८ नक्षलवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडून सामूहिक आत्मसमर्पण केले. या सर्वांवर तब्बल ४ कोटी रुपयांचे बक्षीस होते. जगदलपूर येथील पोलिस समन्वय केंद्र 'शौर्य भवन' येथे दुपारी २ वाजता हा ऐतिहासिक आत्मसमर्पण सोहळा पार पडला. बस्तर विभागातील वरिष्ठ पोलिस अधिकारी, केंद्रीय सुरक्षा दलाचे कमांडर आणि जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या नक्षलवाद्यांनी आपली शस्त्रे खाली ठेवली. या सामूहिक आत्मसमर्पणानंतर बस्तरमधील नक्षली संघटनांच्या 'दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी'ला (डीकेएसझेडसी) मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. बस्तरमध्ये सध्या नक्षलवाद्यांविरुद्ध 'ऑपरेशन प्रहार' आणि इतर मोहिमा तीव्र करण्यात आल्या आहेत. एकीकडे दबाव वाढत असतानाच दुसरीकडे सरकारच्या पुनर्वसन धोरणामुळे नक्षलवादी मोठ्या संख्येने मुख्य प्रवाहात येत आहेत. या धोरणांतर्गत आत्मसमर्पण करणाऱ्यांना तातडीची आर्थिक मदत, घर आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत.आत्मसमर्पण केलेल्या १०८ नक्षलवाद्यांमध्ये बस्तर विभागातील विविध जिल्ह्यांतील जहाल नक्षलवाद्यांचा समावेश आहे. बिजापूर: ३७,दंतेवाडा: ३०, सुकमा: १८, बस्तर: १६, नारायणपूर: ०४, कांकेर: ०३ अशी जिल्हानिहाय संख्या आहे.

# शेतकऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक व आर्थिक अडचणीची सोडवणूक करा

## आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांची मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे मागणी..

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

गडचिरोली :- मुंबई येथे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात धान उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत संबंधित विभागाच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

धान खरेदी प्रक्रियेदरम्यान शेतकरी व खरेदी केंद्र चालकांना येणाऱ्या तांत्रिक व आर्थिक अडचणींबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. सध्या अनेक धान खरेदी केंद्रांवर निश्चित करण्यात आलेली खरेदी क्षमता पूर्ण झाल्यामुळे धान खरेदी बंद असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे धान खरेदीची क्षमता तातडीने वाढवून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यासंदर्भात लवकरच निर्णय घेण्याचे निर्देश मा. मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच आदिवासी विकास महामंडळामार्फत धान विक्री केलेल्या शेतकऱ्यांचे चुकारे अद्याप प्रलंबित असल्याचा मुद्दा बैठकीत ठळकपणे मांडण्यात आला. हे चुकारे तातडीने देण्यात यावेत, अशी



मागणी करण्यात आली. त्यासाठी आवश्यक असलेली प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून येत्या काही दिवसांत शेतकऱ्यांना चुकारे देण्यास सुरुवात होणार आहे. यापुढे शेतकऱ्यांच्या चुकाऱ्यांमध्ये कोणताही विलंब सहन केला जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले. याशिवाय धान साठवणुकीदरम्यान होणारी घटतूट मंजूर करणे, सन २०२५–२६ च्या हंगामात अतिवृष्टीमुळे झालेल्या भाताच्या नुकसानीचे निवारण करणे तसेच भरडाई प्रक्रियेदरम्यान होणारी घटतूट माफ करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. साठवणुकीदरम्यान शासनाने निश्चित केलेल्या तुटीव्यतिरिक्त अतिरिक्त २% तुट मंजूर करणे तसेच धानाची भरडाई वेळेत व्हावी यासाठी आवश्यक सूचना देण्याची मागणीही बैठकीत मांडली. दरवर्षी धान खरेदी प्रक्रियेत विविध अडचणी निर्माण होत असल्यामुळे यासाठी युद्धस्तरावर स्पष्ट Standard Operating Procedure (SOP) तयार करण्यात यावी आणि धान खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व शेतकरी अनुकूल धोरणांद्वारे राबविण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# युद्धाचे पडसाद: शेतकरी संकटात

## तांदूळ निर्यात ठप्प, धानाच्या भावात घसरण

**विदर्भ केसरी । चंद्रपूर**

आखाती देशांमधील युद्धाचे पडसाद आता भारतातील तांदूळ व्यापारावर उमटू लागले आहेत. निर्यात साखळी विस्कळीत झाल्याने कोट्यवधी रुपयांच्या तांदळाची निर्यात ठप्प झाली आहे. गेल्या आठवडाभरात एकही कंटेनर निर्यातीसाठी रवाना झाला नसल्याची माहिती आहे. निर्यात बंद पडल्याने राइस मिल आणि गोदामांमध्ये तांदळाची पोती पडून असून, त्याचा थेट फटका धान उत्पादक शेतकऱ्यांना बसत आहे. बाजारात धानाचा प्रतिक्विंटल भाव २ हजार ३०० रुपयांवरून सुमारे २ हजार रुपयांपर्यंत घसरला असून, यात आणखी घसरण होण्याची भीती व्यक्त होत आहे. निर्यात ठप्प झाल्यामुळे गुजरातमधील बंदरे, मुंबईतील जे. एन. पोर्ट तसेच कोलकाता पोर्ट येथे हजारो क्विंटल तांदूळ तसाच पडून आहे. समुद्रमार्गे होणारी निर्यात मंदावल्याने निर्यातदारांनी खरेदी थांबवली असून व्यापारीही सावध झाले आहेत. ब्रह्मपुरी परिसरातील सहा राइस मिलमधून दररोज सरासरी पाच कंटेनर तांदूळ निर्यातीसाठी पाठविला जात होता. एका कंटेनरमध्ये सुमारे २७ टन तांदूळ यानुसार दररोज सुमारे १३५ टन तांदळाची निर्यात होत होती. हा तांदूळ प्रामुख्याने सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, रशिया तसेच इतर देशांमध्ये पाठविला जात असे. आखाती देशांमध्ये युद्ध भडकताच समुद्री मार्गावरील वाहतूक व निर्यात प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आणि निर्यातीची साखळीच खंडित झाली. निर्यातदारांकडून खरेदी थांबली. व्यापाऱ्यांकडे तांदूळ साठून राहिल्यामुळे शेतकऱ्यांकडून धानखरेदीही मंदावली आहे.इराण हा बासमती तांदळाचा मोठा आयातदार देश असून तेथील आहारात बासमती तांदळाला विशेष महत्त्व आहे.